❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

मुख्यमंत्री आरोग्य संवाद
जागर आरोग्याचा...

५२ हजार तरूणांना आरोग्याचे धडे

मुंबई : दैनिक संध्या

बदलती जीवनशैली, मोबाईलचा वाढता वापर, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण यामुळे तरुणांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज वाढली आहे. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळावे, यासाठी नवरात्रोत्सव काळात राज्यात 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद, जागर आरोग्याचा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत राज्यात आतापर्यंत ३९३ सत्रे झाली असून, ५२ हजार ३८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. तरुण वयातच आरोग्याची काळजी घेण्याच्या योग्य सवयी लागाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्व समजावे, तसेच आरोग्यविषयक प्रश्नांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे, यासाठी ही सत्रे आयोजित केली जात आहेत. या उपक्रमांतर्गत विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत आहेत. या सत्रांमध्ये वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांतील विद्यार्थी सहभागी होत आहेत. विभागनिहाय आकडेवारीनुसार, पश्चिम महाराष्ट्रात १२२ सत्रे झाली असून, त्यात ११ हजार ९८० विद्यार्थी सहभागी झाले. मराठवाड्यात ९१ सत्रांत ९ हजार ८७४, नाशिक विभागात ९३ सत्रांत १० हजार ६३४, तर अमरावती विभागात ६२ सत्रांत ६ हजार ३५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कोकण विभागात ५३ सत्रांत ६ हजार ४०४ विद्यार्थी सहभागी झाले. मुंबई विभागात २४ सत्रे होऊन ३ हजार २६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नागपूर विभागात ४५ सत्रे झाली असून, त्यात ३ हजार ८९३ विद्यार्थी सहभागी झाले. या सत्रांमध्ये संतुलित आहार, नियमित व्यायाम, मानसिक आरोग्य, मोबाइल व सोशल मीडियाचा वापर, व्यसनमुक्ती आणि निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. आरोग्याची काळजी कशी घ्यावी आणि दैनंदिन जीवनात कोणते बदल करावेत, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक होऊन ही माहिती कुटुंबीय आणि मित्रांपर्यंतही पोहोचवावी, हा या उपक्रमाचा हेतू आहे.

'SIR'ला विरोध हे केवळ निमित्त, खरा विरोध लोकशाहीला - मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

देशात विरोधकांनी तसेच कॉंकरोच जनता पार्टीमधील तरुणांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे. राजधानी दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी तसेच एसआयआर रद्द करण्यासाठी कॉंग्रेससह सर्वच विरोधी पक्षांनी आंदोलन सुरू केले आहे. मात्र, या आंदोलनाला 'अराजकता' म्हणत सरकारने विरोधकांवर पलटवार केला आहे. आता पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीकास्त्र डागले आहे. SIR ला विरोध तर फक्त निमित्त आहे, खरा विरोध लोकशाहीला आहे, असे म्हणत फडणवीसांनी टीका केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत म्हटले की, लोकशाही मार्गाने पात्र मतदारांच्या मताच्या माध्यमातून निवडून येण्याची शक्यता दूरदूरपर्यंत दिसत नसल्याने त्यांच्या तोंडून ते 'सत्य' बाहेर आले. देशात अराजकता माजवून सत्ता मिळवण्याचा त्यांचा डाव अखेर उघड झाला आहे. त्यांना SIR का नकोय? कारण त्यांना 'रेजीम' बदलायचीय. निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेवर येण्याची शक्यता नसल्यामुळेच 'रेजीम' बदलण्याची भाषा ते करत आहेत. त्यांना सत्ता उलथून टाकायचीय, पण लोकशाही मार्गाने नव्हे. तसेच SIRला विरोध



हे फक्त निमित्त. खरा विरोध आहे तो लोकशाहीला, खरा विरोध आहे तुमच्या आमच्या पात्र मतांना. आता आपल्याला ठरवायचंय, लोकशाही हवी की 'रेजीम' बदलण्याची भाषा करणारे? लोकशाहीसाठी SIR शिवाय पर्याय नाहीच, अशी टीका फडणवीस यांनी केली आहे.

आंदोलन सुरू असताना पत्रकार परिषदेत वकील प्रशांत भूषण यांनी रेजीम चेंज असा शब्द वापरला होता. म्हणजेच, सत्ता उलथवून लावण्यासाठी हे आंदोलन सुरू असल्याचे प्रशांत भूषण यांनी म्हटले होते. या शब्दावरून सत्ताधाऱ्यांनी पलटवार करण्यास सुरुवात केली आहे. आज देखील मुख्यमंत्र्यांनी त्याच शब्दाला घेत पुन्हा पलटवार केला आहे.

भाजप नेत्यांचा गरब्यात 100 कोटींचा धिंगाणा:अतुल लोंढेंची टीका

■ नागपूर (दै. संध्या)

"राज्यातील शेतकरी आज तीव्र दुष्काळाच्या संकटात होरपळत आहे. पावसाअभावी केळी आणि उभ्या पिकांवर रोटाव्हेटर फिरवण्याची वेळ आली असून जनावरांना प्यायला पाणी व चारा उरलेला नाही. अशा विदारक परिस्थितीत जनतेच्या दुःखावर फुंकर घालण्याऐवजी भाजपचे नेते नवरात्रोत्सवाच्या नावाखाली 'नमो रमो जमझट'सारखे हायटेक इव्हेंट्स भरवून कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करत आहेत. भाजप नेत्यांनी नवरात्रीच्या गरब्यावर तब्बल 100 कोटी रुपयांहून अधिक चुराडा केला असून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीतील एकाच मंडपात रोज 1 ते 1.5 कोटी रुपये खर्च होत आहेत. मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाणारा हा प्रकार असून बळीराजाची ही क्रूर थट्टा करणाऱ्या रवींद्र चव्हाण आणि मंत्री आशिष शेलार यांचा देवेंद्र फडणवीसांनी तत्काळ राजीनामा घ्यावा," असा घणाघाती आरोप कॉंग्रेसचे नेते अतुल लोंढे यांनी पत्रकार परिषदेत केला.

नागपूर येथे माध्यमांशी बोलताना अतुल लोंढे यांनी भाजपच्या गरबा महोत्सवांमधील उधळपट्टीचा संपूर्ण ताळेबंद मांडला, तसेच महिला सुरक्षेबाबत राष्ट्रसेविका समितीच्या भूमिकेवर आणि तिरंगा फडकवणाऱ्या आंदोलकांवरील पोलिसी कारवाईवर सडकून टीका केली.



भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीतील 'नमो रमो जमझट' गरबा महोत्सवाच्या खर्चाचा पाढा वाचताना अतुल लोंढे म्हणाले, डोंबिवलीच्या संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलात 7,000 चौरस फुटांचा इनडोअर आणि 20,000 चौरस फुटांचा आउटडोअर प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. मंडपात तब्बल 2,000 टन क्षमतेची एसी यंत्रणा बसवण्यात आली असून तिचे दररोजचे भाडेच 7 लाख रुपये आहे.

4 ते 5 तासांच्या गरब्यासाठी साऊंड व एलईडी रोषणाईवर दररोज 25 लाख रुपये उधळले जात आहेत. वीजपुरवठ्यासाठी लावलेल्या 25 जनरेटर सेट्सचे रोजचे भाडे 7.5 लाख रुपये आहे, तर फुलांच्या आराशीवर दररोज 3 ते 5 लाख रुपये खर्च होत आहेत. गुजरातमधून बोलावलेला प्रसिद्ध गायक निलेश गढवी एका कार्यक्रमाचे 1 ते 2 कोटी रुपये मानधन घेतो, तर इतर स्थानिक गायक 2 ते 5 लाख रुपये रोज घेत आहेत. सिम्फनी बँडसह गायकांवर रोज 4 ते 5 कोटींचा खर्च होत आहे.

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार: जन्मदात्या वडिलांना नैसर्गिक मृत्यूपर्यंत आजन्म कारावास

■ हिंगोली (दै. संध्या)

हिंगोली जिल्ह्यात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम जन्मदात्या वडिलांना हिंगोली जिल्हा न्यायालयाने नैसर्गिक मृत्यूपर्यंत आजन्म सश्रम कारावास आणि १ लाख २ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. हिंगोलीच्या जिल्हा न्यायाधीश एस. एन. माने-गाडेकर यांनी शनिवारी ता १७ हा महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, न्यायालयाने पिडीत मुलीला मनोधैर्य योजने अंतर्गत ५ लाखांची आर्थिक मदत देण्याचेही निर्देश शासनाला दिले आहेत.

या बाबत सरकारी वकिल ॲड एन.एस. मुटकुळे यांनी दिलेल्या माहिती नुसार, हिंगोली जिल्ह्यातील एका पीडित अल्पवयीन मुलीने २९ एप्रिल २०२३ रोजी तक्रार दिली. फिर्यादीनुसार, ता १८ एप्रिल २०२३ ते २० एप्रिल २०२३ दरम्यान तिच्या वडिलांनी तिला गुलाबजामुन, भेळ आणि कलाकंदमध्ये गुंगीचे औषध दिले. त्यामुळे तिला गुंगी आल्यावर आणि ती अर्धवट झोपेत असताना आरोपी वडिलांनी तिच्यासोबत छेडछाड केली. त्यानंतर २२ एप्रिल २०२३ रोजी रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास आरोपीने पीडित मुलीचे दोन्ही हात ओढणीने बांधून तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. या घटनेबाबत कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन तिला चापट-बुक्यांनी मारहाणही केली होती.

पीडितेच्या तक्रारीवरून संबंधित पोलीस ठाण्यात आरोपी पित्या विरुद्ध विविध कलमांसह पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक श्रीमती श्रीदेवी वग्गे यांनी तपास करून जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

सदर प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश एस. एन. माने गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणी साठी आले होते. प्रकरणात एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडीत मुलीची साक्ष महत्वाची ठरली. न्यायालयातील सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपी पित्याला 'नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत आजन्म सश्रम कारावास' व एकूण १ लाख दोन हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

याशिवाय न्यायालयाने पीडित अल्पवयीन मुलीला शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत ५ लाख रुपये आर्थिक मदत म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. या खटल्यात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील एन. एस. मुटकुळे यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी वकील एस. डी. कुटे, सविता एस. देशमुख, आणि कोर्ट पैरवी पोलीस अंमलदार प्रमोद मार्कड यांनी सहकार्य केले.

दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात 5,000 रुपयांची अग्रीम मदत; उपमुख्यमंत्री शिंदेंची घोषणा

■ पुणे (दै. संध्या)

"नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला असला, तरी महायुती सरकार अन्नदात्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. बळीराजाची दिवाळी काळी होऊ देणार नाही, हा आमचा ठाम निर्धार आहे. दुष्काळी मदतीची अंतिम प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होण्यास वेळ लागत असला, तरी सण गोड व्हावा यासाठी मंत्रिमंडळाने तातडीने निर्णय घेत प्रत्येक पात्र शेतकऱ्याला दिवाळीपूर्वी 5,000 रुपयांची अग्रिम (आगाऊ) मदत थेट बँक खात्यात देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकरी हा आमच्या सरकारचा केंद्रबिंदू असून त्याला मदत करताना शासन हात आखडता घेणार नाही किंवा त्याला वाऱ्यावर सोडणार नाही," असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

पुणे दौऱ्यावर असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी दुष्काळी उपाययोजना, केंद्र सरकारकडून मिळणारे साहाय्य आणि कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी न्यायव्यवस्थेविरोधात छेडलेल्या आंदोलनावर रोखठोक भाष्य केले.



राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीवर बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले, "मंत्रिमंडळाने दुष्काळ जाहीर केल्यानंतर नियमानुसार मदत वितरणास वेळ लागतो. मात्र, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ नये यासाठी आम्ही 5,000 रुपयांचा तातडीचा अग्रिम देण्याचा निर्णय घेतला. ही रक्कम दिवाळीपूर्वीच थेट बँक खात्यात जमा होणार असून, यामुळे शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल."

"शेतकऱ्यांच्या या संकटात राज्य सरकार तर सर्वतोपरी मदत करतच आहे, पण त्यासोबतच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना मोठ्या प्रमाणावर केंद्राकडून साहाय्य करण्याचे आश्वस्त केले आहे. मी स्वतः, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संपूर्ण मंत्रिमंडळ शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी कटिबद्ध आहोत."

कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आंदोलनावर आणि निवडणूक आयोगावरील आरोपांवर विचारले असता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सडकून टीका केली. "देशाच्या इतिहासात विरोधी पक्षाने सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्याचा आणि न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा प्रकार पहिल्यांदाच घडला आहे. हा प्रकार अत्यंत लज्जास्पद आणि निषेधार्ह आहे. विरोधी पक्षनेतेपदावर बसलेल्या व्यक्तीला संविधानाचा विसर पडला आहे का?" हातात संविधानाचे पुस्तक घ्यायचे आणि प्रत्यक्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या संविधानिक संस्थांवर आणि न्यायव्यवस्थेवरच प्रहार करायचा, ही विरोधकांची दुटप्पी वृत्ती आहे. संविधानाने दिलेल्या स्वायत्त यंत्रणांचा गळा घोटण्याचे काम हे लोक करत आहेत.

कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन कोणी कारवाया केल्यास निलंबन; नरहरी झिरवाळांची वॉर्निंग

■ जळगाव (दै. संध्या)

राज्यात सध्या एफडीएच्या कारवाईचं धाडसत्र सुरुच असून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढेंच्या निर्देशान्वये भेसळयुक्त आणि अनियमितता आढळून आल्यास परवाने निलंबनाची देखील कारवाई होत आहे. सध्या दसरा, दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई केली जात असून अधिकाऱ्यांचा धसकाच दुकानदार, हॉटेलवाल्यांनी घेतला आहे. मात्र, काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून नियमाच्या बाहेर जाऊन कारवाई होत असल्याचीही ओरड आस्थापनाधारकांची आहे. त्याच, पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरळी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना थेट वॉर्निंग दिली आहे.

एफडीए अंतर्गत कारवाई करताना, कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन कोणी कारवाया केल्या असतील आणि त्यात ते दोषी आढळून आले तर त्यांवर निलंबनाची कारवाई केली जाऊ शकते, असा इशाराच मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे. मात्र, याबाबत मुख्यमंत्री निर्णय घेणार असल्याचं देखील त्यांनी म्हटलं. एफडीएच्या काही अधिकाऱ्यांनी कार्यक्षेत्राबाहेर जाऊन कारवाया केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर अन्न आणि औषध खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ यांनी आपली प्रतिक्रिया दिली. या घटनेत जे कोणी दोषी असेल त्यांच्याबाबत निलंबित करण्याची कारवाई केली जाऊ शकते, यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या सोबत चर्चा झाली आहे. या घटनेत काय कारवाई करावी, याबाबत मुख्यमंत्री निर्णय देतील. मात्र, यामध्ये जे पाच-सात अधिकारी किंवा अन्य कोणीही दोषी आढळून आले आहे, त्यांवर निश्चितरित्या कारवाई केली जाणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी एफडीएमधील 5 अधिकाऱ्यांवरील निलंबनाच्या कारवाईवरुन रणकंदन माजले होते. नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव येथील सुपाऱ्यांच्या ट्रकवरुन करण्यात आलेल्या कारवाईत भ्रष्टाचार झाल्याचं प्रकरण समोर आलं होतं. त्यानंतर, मुख्यमंत्र्यांनी या घटनेची दखल घेत संबंधितांवर निलंबनाची कारवाई सुरू केल्याची माहिती आहे.

2 दिवसांत 48 लाखांचा अन्नसाठा जप्त

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कोकण व पुणे विभागात 14 आणि 15 ऑक्टोबर रोजी राबवलेल्या विशेष शोधमोहिमेत मुदतबाह्य व खराब अन्नाची विल्हेवाटीच्या नावाखाली पुन्हा खुल्या बाजारात फेरविक्री करणाऱ्या साखळीचा पर्दाफाश केला आहे. त्यामध्ये जप्त साठा व परवाने निलंबन करण्याची कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण 48 लाख 8 हजार 924 रुपयांचा संशयास्पद व खराब अन्नसाठा उघडकीस आला आहे. भिवंडी, अंबरनाथ आणि खेड (चाकण-निघोजे) मधील बड्या कंपन्यांच्या 5 गोदामांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत, तर 2 विनापरवाना आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळाकडे समस्या म्हणून पाहू नका संधी शोधा, गावातील पाणी गावात राहिलं पाहिजे यासाठी बांधबंधिस्ती करा, मुंढेंचा सल्ला

■ पिंपरी चिंचवड (दै. संध्या)

दुष्काळाकडे केवळ समस्या म्हणून पाहू नका, तर त्यात संधी शोधा, असा महत्त्वपूर्ण सल्ला आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. पिंपरी-चिंचवडमधील 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'मध्ये बोलताना त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. आव्हान म्हणून नव्हे तर प्रॉब्लेम स्टेटमेंट म्हणून बघा, दुष्काळ का येतो, पुढील सहा ते सात महिन्यात काय करु शकतो, याचा विचार करा असं तुकाराम मुंढे म्हणाले. तुकाराम मुंढे यांनी दुष्काळाच्या काळात दुग्ध व्यवसायात संधी असल्याचं सांगितलं. याशिवाय ग्रामीण भागात पाणी अडवा पाणी जिरवाची गरज असल्याचं देखील त्यांनी स्पष्ट केलं.

मी अन्न व औषध प्रशासन क्षेत्रात काम करतो, त्यामध्ये दूध येतं. आपल्याकडे दुधाची कमतरता आहे का तर आहे. दूग्ध उद्योजक वाढू शकतो का वाढू शकतो. दूधाला दर मिळू शकतो का, अजूनही वाढू शकतो. दोन चार महिन्यात दर वाढलेले आहेत आणखी वाढतील. या क्षेत्रातील गैर प्रकार रोखले पाहिजेत, यात मी नियामक म्हणून काम करतोय, यात सगळ्यांचा सहभाग हवा आहे, असं मुंढे यांनी म्हटलं.

पशुसंवर्धन विभागात असताना तो विभाग उद्योजक म्हणून बघावं असं ठरलं होतं. आपण ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय करायचं ठरवलं तर त्याच्यात खूप संधी आहे. गाई घ्याव्या लागतील, पाणी लागेल असा प्रश्न आहे, हायड्रोपोनिक्स



म्हणजे घटस्थापनेपेक्षा वेगळं काही नाही. फक्त शेतकऱ्याला समजून सांगण्याची गरज आहे. जेवढं पाणी तुळशीला लागतं तितकं त्या हायड्रोपॉनिक्सला लागतं, त्यापेक्षा जास्त नाहीत. ते केलं तर त्यात प्रोटिन अधिक मिळतं, उत्पादन वाढतं. कमी पाण्यात दुग्ध व्यवसाय करु शकतो, शुद्ध दूध असेल तर त्याला मागणी आहे, दुग्ध आधारित उद्योग करता येतात, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

दुष्काळाकडे प्रॉब्लेम स्टेटमेंट म्हणून पाहिलं पाहिजे. शासनाचं काम मदत करणं काम आहे, ते करत राहतील. दरवर्षी टँकर मागतो, ट्यूबवेल मागतो कधीतरी आपण या प्रश्नाचा विचार केलाय का, आपण दरवर्षी शासनाकडे मागतो, शासन देतं पण ते जातं कुठं. एका गावासाठी ट्यूबवेल किती केल्या असतील तर त्याचं अकाऊंटिंग केलंय का असा सवाल तुकाराम मुंढे यांनी केला.

मी जेन झी सारखा डिजीटल युगात जन्मलेला नाही, पण त्याचा वापर करतो. लहानपणी गावात शेती व्हायची. त्यावेळी आमच्या गावात हापशा, हँडपंप न्हवता, नंतर ट्यूबवेल आलं. नंतर पाईपलाईन आली. गावात कॉंक्रिट रस्ते झाले. गावातील विहिरी, ट्यूबवेलचं पाणी आटलेलं आहे. पाणी तळ्यात आहे. तळ्यात तुमच्या गावातून आणि शेतातून पाणी गेलं. कॉंक्रिटीकरण केल्यानं पाणी थांबवण्याऐवजी पाणी काढून दिलं. तुमच्या शेतातील पाणी वाहून जाण्यासाठी कॉंक्रिटीकरण केलं. आवश्यक असेल तिथं कॉंक्रिटीकरण केलं पण पाणी पण गावात राहिलं पाहिजे, असं तुकाराम मुंढे म्हणाले.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे दुष्काळावर उपाय पाणी अडवा पाणी जिरवा हाच आहे. तुमच्या गावातील पाणी गावात राहिलं पाहिजे हा सर्वात मोठा असेट आहे. दरवर्षी 300 मिलीमीटर पाणी, 400 मिलीलीटर, 500-1000 मिलीलीटर पाऊस जिथं जिथं पडतो,ते पाणी कुठं जातं. ते पाणी जाऊ देतो कारण 5 फूट बांध होता तो आता एक फूट नाहीये. बांध कोरुन टाकला त्यामुळं पाणी शेतात थांबत नाही, ते पाणी वाहत नदीला जातं, तिथून तळ्यात गेलं. तुम्हाला निसर्गानं दिलेलं पाणी वाया घालवता आणि नंतर विकत घेता, असं तुकाराम मुंढे म्हणाले. एका शेतकऱ्यानं नव्हे गावांच्या गावांनी मिळून बांधबंधिस्ती हा एकमेव कार्यक्रम केला तरी पुढच्या वर्षी 300 मिलीलीटर पाऊस पडला तरी तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही. आपल्याकडे हिवरेबाजारचं उदाहरण आहे, याही परिस्थितीत त्या गावात करोडपती शेतकरी आहेत. कारण पाणी आडवलंय, त्या पाण्याचा योग्य पद्धतीनं पीक पद्धतीत वापर केलाय, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं. उद्योजकांनी सीएसआरच्या माध्यमातून बांधबंधिस्तीचं काम हाती घ्यावं, मी त्यात पहिल्यांदा सहभागी होईन, असंही तुकाराम मुंढे म्हणाले.

संपादकीय

मुलं,पालक आणि मोबाईल

आजकाल पालकांशी बोलताना मुलांच्या मोबाईल वापराचा विषय निघतोच. जवळजवळ प्रत्येक घरात हीच तक्रार ऐकायला मिळते. मुलगा मोबाईल सोडत नाही, मुलांचे लक्ष अभ्यासात लागत नाही,सतत गेम खेळतात,मोबाईल काढून घेतला की चिडचिड करतात. पालकांची चिंता स्वाभाविक आहे. मोबाईलचा अतिरेक मुलांच्या अभ्यासावर परिणाम करतो, मैदानी खेळ कमी होतात,झोपेच्या सवयी बदलतात आणि घरातला संवादही कमी होतो.पण या सगळ्याचा विचार करताना आपण एका गोष्टीकडे थोडे दुर्लक्ष करतो.

मुलाच्या हातात मोबाईल पहिल्यांदा आला तरी कुठून?

बहुतेक वेळा तो पालकांनीच दिलेला असतो.मुल जेवत नसेल तर मोबाईल दिला जातो.मुल रडत असेल तर त्याच्या हातात मोबाईल दिला जातो.घरात पाहुणे आले असतील आणि मुलाने शांत बसावे असे वाटत असेल तर मोबाईल दिला जातो.आईला काम असेल, बाबांना एखादे महत्त्वाचे काम असेल,तेव्हाही मुलाला काही वेळ मोबाईल देऊन ठेवणे सोपे वाटते. त्या वेळी त्यात काही चुकीचे वाटत नाही. "काय होतंय एवढं? थोडा वेळ पाहू दे," असे म्हणून आपण विषय सोडून देतो.पण मुलांच्या सवयी अशाच छोट्या छोट्या गोष्टींमधून तयार होतात.हळूहळू तो थोडा वेळ वाढत जातो आणि मोबाईल हातात नसला की मुलाला बेचैनी वाटू लागते. नंतर पालक म्हणतात, मोबाईल कमी कर.मुल ऐकत नाही. पालकांचा राग वाढतो आणि मुलांची चिडचिडही वाढते.इथे मुलाला दोष देण्यापूर्वी आपण सुरुवात कुठून झाली,हेही पाहायला हवे. मुलं फक्त आपण सांगतो ते ऐकत नाहीत,तर आपण जे करतो तेही बारकाईने पाहत असतात.

आपण मुलाला मोबाईलपासून दूर राहायला सांगतो,पण स्वतः मात्र उठल्यापासून झोपेपर्यंत मोबाईल हातात ठेवतो.जेवताना फोन पाहतो,मोकळा वेळ मिळाला की सोशल मीडियावर जातो आणि मुलं काही सांगत असतानाही आपले लक्ष फोनकडे असते. मुलांच्या हातातला मोबाईल पाहण्यापूर्वी एकदा आपल्या हातातल्या मोबाईलकडेही पाहायला हवे.मुलांना आपण काय सांगतो यापेक्षा आपण काय करतो, याचा जास्त परिणाम होत असतो. कधी कधी मुलाला मोबाईलची गरज नसते.त्याला फक्त कुणीतरी जवळ बसावे असे वाटत असते. मूल शाळेतून घरी आले की त्याला दिवसभरात काय झाले ते सांगायचे असते. एखादा मित्राशी भांडण झालेले असते. शिक्षकांनी कौतुक केलेले असते. कुठलीतरी गोष्ट मनाला लागलेली असते.कधी कधी त्याला काही विशेष सांगायचेही नसते.फक्त आई-बाबांनी जवळ बसावे, एवढीच अपेक्षा असते. पण आपण त्याला वेळ देण्याऐवजी हातात मोबाईल देतो. हळूहळू मुलाला प्रत्येक वेळी मोबाईलमध्येच करमणूक मिळू लागते.कंटाळा आला की मोबाईल, राग आला की मोबाईल,एकटेपणा वाटला की मोबाईल.त्याला स्वतःशी राहण्याची आणि इतरांशी बोलण्याची सवय कमी होत जाते. मोबाईल वाईट आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आज शिक्षणासाठी, माहिती मिळवण्यासाठी आणि अनेक आवश्यक कामांसाठी मोबाईलचा उपयोग होतो.मुलांनीही तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकायला हवा. पण मोबाईल हा आई-बाबांचा पर्याय होऊ शकत नाही. मुलाला एखादी गोष्ट समजत नसेल तर मोबाईल माहिती देऊ शकतो,पण त्याच्या मनात नेमके काय चालले आहे, हे समजून घेण्यासाठी पालकांची गरज असते. मूल एखाद्या गोष्टीमुळे दुःखी असेल तर मोबाईल त्याचे लक्ष काही काळ दुसरीकडे वळवू शकतो,पण त्याला धीर देण्यासाठी आई-बाबांचा शब्दच उपयोगी पडतो.


आज मुलांकडे पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त सुविधा आहेत.चांगली शाळा,क्लास,खेळाची साधने, मोबाईल,इंटरनेट,संगणक या सगळ्या गोष्टी सहज उपलब्ध आहेत.पण एक गोष्ट कमी होत चालली आहे आणि ती म्हणजे घरातला मोकळा संवाद. पूर्वी संध्याकाळी मुलं बाहेर खेळायला जायची.घरी आली की आजी-आजोबांकडे बसायची. आईला दिवसभरात काय झाले ते सांगायची.बाबा घरी आले की त्यांच्याशी बोलायची.आज घरात सगळे असतात,पण प्रत्येक जण आपल्या स्क्रीनमध्ये गुंतलेला असतो. मुलांच्या मोबाईल वापरावर नियम असायलाच हवेत. किती वेळ मोबाईल वापरायचा,अभ्यासाच्या वेळी मोबाईल कुठे ठेवायचा,रात्री मोबाईल कधी बंद करायचा,काय पाहायचे आणि काय टाळायचे, याबद्दल पालकांनी मुलांशी बोलणे गरजेचे आहे.पण हे नियम फक्त मुलांसाठी असतील तर त्यांचा परिणाम किती होईल,याचाही विचार करायला हवा. मुलाला जेवताना मोबाईल वापरू नकोस म्हणताना आपणही फोन बाजूला ठेवला पाहिजे. मुलांशी बोलताना त्याच्याकडे पाहिले पाहिजे.त्याने एखादी छोटीशी गोष्ट सांगितली तरी ती मनापासून ऐकली पाहिजे. मुलांना मोठ्या गोष्टींची नेहमीच गरज नसते.त्यांना पालकांचा वेळ, लक्ष आणि विश्वास अधिक महत्त्वाचा असतो. मुलाला मोबाईलपासून दूर ठेवायचे असेल तर फक्त मोबाईल काढून घेऊन उपयोग नाही.त्याच्या आयुष्यात दुसऱ्या गोष्टी आणाव्या लागतील.त्याच्यासोबत थोडे खेळणे, फिरायला जाणे, पुस्तक वाचणे,एखादे काम एकत्र करणे, त्याच्या आवडी जाणून घेणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याचे बोलणे शांतपणे ऐकणे. मुलाला असे वाटले पाहिजे की काहीही झाले तरी आई-बाबांशी बोलता येते.ही भावना तयार झाली की मोबाईल त्याचे जग राहणार नाही.तो फक्त त्याच्या आयुष्यातले एक साधन राहील. म्हणून मुलाला रोज किती वेळ मोबाईल वापरतोस,असे विचारण्याआधी आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा.

थोडक्यात पण महत्वाचे

बंधाऱ्याचे लोखंडी ढापे बसविण्यासाठी जिल्हा परीषदेचा 2 कोटी निधी

राजगुरुनगर : दैनिक संध्या

दुष्काळी परीस्थितीवर मात करण्यासाठी पुणे जिल्हा परीषदेच्या अखत्यारीत छोटे पाटबंधारे विभागाच्या ओढ्यावरील बंधाऱ्यात पाणी अडवण्याची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. खेड तालुक्यातील ५० गावातील १०१ बंधाऱ्यापैकी ३५ ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील ६१ बंधाऱ्यांचे लोखंडी ढापे बसविण्याची कामे पुर्ण झाली. यामुळे रब्बी हंगामातील ९०० हेक्टर शेतजमिन ओलिताखाली येणार असल्याची माहिती छोटा पाटबंधारे उपविभाग उपअभियंता रुपाली तांदळे यांनी दिली. खेड पंचायत समितीच्या छोटे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील खेड तालुक्यात ५० गावातील १०१ कोल्हापुर पध्दतीचे, साठवण बंधारे, वळण बंधारे असुन जवळपास २५ बंधारे लोखंडी ढापे चोरीला गेल्याने आणि जुलै आँगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसात निकामी ठरले. खेड तालुक्यात यंदा पावसाने अवकृपा केल्याने परतीचा पावसाने माघार घेतल्याने खरीप हंगामातील हातात येणारी पिके वाया गेल्याने बळीराजाच्या तोंडचा घास हिरावुन घेतल्याचे स्पष्ट झाले. तालुक्यातील ५० बंधाऱ्यांचे ढापे बसवणे आणि पावसाळ्यापुर्वी ढापे काढण्यासाठी जिल्हा परीषदेने १६ जुलै रोजी ३ कोटी ९२ लाख ३८३२ रुपयांचे अंदाज पत्रकीय रक्कमेला मंजुरी दिल्याप्रमाणे बंधाऱ्याच्या ढाप्यांच्या संख्येनुसार संबंधित कामासाठी ग्रामपंचायतीने एकुण खर्चाच्या ५० टक्के रक्कम वर्ग करण्यात आली तर ५० टक्के खर्च ग्रामपंचायतीनी स्वनिधी तुन खर्च करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती तादंळे यांनी दिली.



शिरूरमध्ये कायद्याचा धाक कमी झाला? आनंद सोसायटीत घरात घुसून गोळीबार; घरमालक गंभीर, १२ वर्षीय मुलगीही जखमी

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर शहरात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरातील आनंद सोसायटीसारख्या उच्चभ्रू वस्तीमध्ये शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) पहाटे साडेचारच्या सुमारास एका अज्ञात चोरट्याने घरात घुसून पिस्तुलातून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. या गोळीबारात घरमालक उमेश चंदनमल छाजेड (वय ४३) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांची अल्पवयीन मुलगी मानवी हिच्याही हाताला दुखापत झाली आहे. या घटनेमुळे शिरूर शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायद्याचा धाक कमी होत आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास अंदाजे २० ते २५ वर्षे वयाचा एक अज्ञात चोरटा आनंद सोसायटीतील छाजेड यांच्या घरात किचनमधील बंद दरवाज्यातून अनधिकृतपणे घुसला. घरात प्रवेश केल्यानंतर त्याने छाजेड यांच्या आईचा मोबाईल फोन चोरला. दरम्यान, घरातील हालचाली लक्षात आल्यानंतर उमेश छाजेड यांच्याशी चोरट्याचा सामना झाला. यावेळी चोरट्याने छाजेड यांना उद्देशून, 'आता तुला जिवंत सोडत नाही,' असे म्हणत त्यांच्या डोक्याच्या दिशेने पिस्तुलातून गोळी झाडली. या हल्ल्यात छाजेड गंभीर जखमी झाले. गोळीबाराच्या या थरारक प्रसंगात त्यांची मुलगी मानवी हिच्या हातालाही दुखापत झाली. पहाटेच्या शांत वातावरणात घडलेल्या या घटनेने परिसरातील नागरिक हादरले आहेत. घरात कुटुंबीय झोपलेले असताना चोरट्याने थेट घरात प्रवेश करणे, चोरी करणे आणि विरोध होताच पिस्तुलातून गोळीबार करणे, यामुळे शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

विशेष म्हणजे, याच परिसरातील शेजारी अजित शेठ ओसवाल यांच्या घरीही घरफोडी करून चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हा चोरटा आणखी कोणत्या घरांना लक्ष्य करण्याच्या प्रयत्नात होता, याचाही तपास होणे आवश्यक आहे. शिरूर शहरात यापूर्वी गणेशोत्सवाच्या काळात गोळीबाराची घटना घडली होती. त्यानंतर आता नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भरवस्तीत घरात घुसून पिस्तुलातून गोळीबार झाल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. सण-उत्सवांच्या काळात नागरिकांची वर्दळ वाढलेली असते. अशा वेळी शहरात गोळीबारासारख्या घटना घडत असतील, तर सामान्य नागरिकांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची, असा सवाल उपस्थित होत आहे.

शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांची गस्त अधिक प्रभावी करणे, संशयितांवर लक्ष ठेवणे, संवेदनशील भागांमध्ये रात्रीच्या वेळी नियमित गस्त वाढवणे आणि गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. मात्र, या घटनेमागील नेमकी कारणे आणि आरोपीची ओळख तपासातूनच स्पष्ट होणार आहे.या प्रकरणी उमेश छाजेड यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नकाते या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. गोळीबार करून फरार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.आनंद सोसायटीतील या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, आरोपीला तातडीने अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना निर्भयपणे वावरता यावे, यासाठी शिरूर पोलिसांनी अधिक सतर्कता दाखवून गुन्हेगारीला आळा घालण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

हवेली तालुका शिवसेनेची आठवा बैठक उत्साहात संपन्न

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)



हवेली तालुका शिवसेनेची आठवा बैठक वाघोली येथील एका सभागृहात उत्साही वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत शिवसेनेचे प्रमुख मार्गदर्शक आरोग्यदुत मंगेश चिवटे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. हवेली तालुक्यात शिवसेनेच्या माध्यमातून व्यापक प्रमाणावर विकासकामे हाती घेण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना मंगेश चिवटे म्हणाले की, शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे. तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्याला ताकद देण्याबरोबरच मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीचे यशस्वी आयोजन तालुका प्रमुख विपुल शितोळे, युवासेना जिल्हा प्रमुख गणेश सातव आणि शिवसेना जिल्हा समन्वयक गणेश मरके यांनी केले होते. यावेळी युवासेना संपर्क प्रमुख अनिकेत जावळकर, जिल्हा प्रमुख बापूसाहेब शिंदे, शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख तृप्ती सरोदे, जिल्हा संघटक निलेश काळभोर, जिल्हा नियोजन समिती सदस्य अलंकार कांचन, उपजिल्हा प्रमुख शामराव माने, युवासेना तालुका प्रमुख विक्रम वाघमारे यांच्यासह हवेली तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेत त्यांच्या समस्या व अपेक्षांचा आढावा घेण्यात आला. कार्यकर्त्यांच्या भावना वरिष्ठांपर्यंत पोहोचवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे विपुल शितोळे यांनी सांगितले. या बैठकीमुळे हवेली तालुक्यात शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असून, आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

नेटबॉल स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे घवघवीत यश

■ पुणे (दै. संध्या)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे अंतर्गत झालेल्या पुणे जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धा दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीच्या क्रीडांगणावर संपन्न झाल्या. या स्पर्धेत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने तसेच १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. तर १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

१९ वर्ष वयोगट मुले संघातील स्वरम जाधव, आदित्य थोरात, सौमिल गायकवाड, सोहम चव्हाण, आदित्य चौधरी, प्रीतम यादव, श्रेयश व्होरकाटे, सूरज गावडे, आदित्य चौधरी, अथर्व जाधव या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी अतुलनीय कौशल्य, उत्कृष्ट चपळता, परस्परांमधील समन्वय, जिद्द आणि विजयासाठीची चिकाटी या जोरावर विजेतेपद प्राप्त केले. १९ वर्ष वयोगट मुली संघातील वैष्णवी सुर्यवंशी, अनुजा जाधव, आरती कदम, साक्षी करे, अपेक्षा मेरगळ, सलोमी वागले, मुग्धा हिरेमठ, प्रीती प्रकाश भोसले, आदित्य चौधरी, अथर्व जाधव या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सांघिक कौशल्य, चपळता, जिद्द आणि चिकाटी च्या जोरावर विजेतेपद प्राप्त केले.

ज्ञानवर्धिनी विद्यालयात विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

■ चाकण (दै. संध्या)



येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयातील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय, चांडोली आणि पंचायत समिती, खेड यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्र वाघमारे व आरोग्य अधिकारी तृप्ती गायकवाड यांनी शालेय विद्यार्थ्यांची नेत्ररोग, त्वचारोग, दंतरोग तसेच इतर आजारांची तपासणी केली. किरकोळ आजार असलेल्या विद्यार्थ्यांना तत्काळ औषधोपचार देण्यात आले. तर गंभीर आजार आढळलेल्या विद्यार्थ्यांना पुढील उपचारांसाठी ग्रामीण रुग्णालय, चांडोली व चाकण आरोग्य विभागाकडे संदर्भित करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी वैद्यकीय पथकाचे कौतुक केले. याप्रसंगी प्रमिला गोरे, सविता कुमकर, नितीन शिंदे, शुभांगी काळे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ज्ञानवर्धिनी विद्यालयात राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे मनिषा गोरे, जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, आरती परदेशी, मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, रूपाली कांडगे यांनी स्वागत होत आहे.

'सर्जनशील लेखन कार्यशाळा' संपन्न

■ बारामती (दै. संध्या)



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मराठी विभाग व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी 'सर्जनशील लेखन कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध लेखक, कीर्तनकार व सूत्रसंचालक प्रा.स्वामीराज भिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सर्जनशील लेखनाकडे वळण्यासाठी चांगल्या वाचनाची सवय असणे आवश्यक आहे. वाचन चांगले असेल, तर आपण समूहाचे प्रभावी नेतृत्व करू शकतो. चांगली माणसे समजून घेण्यासाठी आधी माणसे वाचायला शिकले पाहिजे. तसेच, लेखन करताना अफाट निरीक्षणशक्ती आणि कल्पनाशक्ती, परिसर प्रत्यक्ष पाहून वर्णन करणे इ. गोष्टी महत्त्वाच्या असून, त्यांच्या आधारे आपण उत्तम आणि प्रभावी लेखन करू शकतो," असे मत प्रमुख वक्ते प्रा.स्वामीराज भिसे यांनी व्यक्त केले. लेखनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना सर्जनशील लेखनाची ओळख करून देणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे, भाषिक कौशल्यांचा विकास करणे आणि लेखनातून स्वतःच्या भावना व विचार प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश सदर कार्यशाळेतून संपन्न झाला. लेखनातील विविध शैली, विषयांची निवड, आशयाची मांडणी आणि अभिव्यक्तीची प्रभावी पद्धत याविषयी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अविनाश जगताप यांनी कार्यशाळेचे अध्यक्षस्थान भूषविले. मराठी विभागप्रमुख व कला शाखेच्या अधिष्ठाता प्रा.डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी स्वागत केले.

गुरुवर्य सबनीसांचे कार्य सतत प्रेरणा देणारे : खासदार डॉ. कोल्हे

■ नारायणगाव (दै. संध्या)



"नारायणगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये ग्रामोन्नती मंडळाची स्थापना करून बहुजनांना शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य गुरुवर्य सबनीस यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविद्येमुळे समाजाचे झालेले नुकसान टाळण्यासाठी अधिकाधिक शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे असे सांगितले. गुरुवर्य सबनीसांनी याच विचारांना पुढे नेत कृषी शिक्षणातून समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. परिसरातील शेतकरी आणि बहुजन वर्गाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. गुरुवर्य सबनीसांचे कार्य सतत प्रेरणा देणारे आहे"असे मनोगत शिरूर मतदार संघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव यांच्या वतीने गुरुवर्य रा.प.सबनीस यांच्या 66 व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन सभेत ते बोलत होते.

यावेळी जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके, ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाश पाटे, मोनिका मेहेर, कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर, अध्यक्ष सुजित खैरे,उपाध्यक्ष शशिकांत वाजगे, कार्यवाह रवींद्र पारगावकर, अरविंद मेहेर, डॉ.आनंद कुलकर्णी, डॉ.संदीप डोळे, रत्नदीप भरवीरकर, तानाजी वारुळे, अल्हाद खैरे, सोमजी पटेल, देवेंद्र बनकर, ऋषिकेश मेहेर, डी. के.भुजबळ, सुखदेव बनकर, निलेश पाटे, एकनाथ शेटे, विकास दरेकर, ऋजित मेहेर, सुरेश संचेती, शास्त्रज्ञ प्रशांत शेटे, राहुल घाडगे, प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी, प्राचार्य राधाकृष्ण गायकवाड, प्राचार्य मिलिंद भुजबळ, मुख्याध्यापिका मानसी भालेराव, सीमा कुलकर्णी, उपप्राचार्य संजय वलटे, सर्व विभागांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी, माजी मुख्याध्यापक, शिक्षक, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आमदार अतुल बेनके यावेळी म्हणाले की "ग्रामोन्नती मंडळ व त्यांचे सर्व पदाधिकारी सांघिक प्रयत्न करून उत्तम दर्जाची शिक्षण व्यवस्था चालवीत आहेत. दर्जेदार व आधुनिक शिक्षण देणारी ग्रामीण भागातील ग्रामोन्नती मंडळ या संस्थेचा नावलौकिक सर्व दूर पसरला आहे. कालानुरूप शिक्षण क्षेत्रातील ध्येय धोरणांचा बदल संस्थेने वेळोवेळी स्वीकारला आहे.अद्ययावत आणि आधुनिक शिक्षण देणारी ग्रामोन्नती मंडळ ही अग्रगण्य संस्था आहे".

संस्थेचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर म्हणाले की "आज गुरुवर्य नानासाहेब सबनीस यांसोबत त्यांचे आदर्श विद्यार्थी व महाराष्ट्राचे माजी मंत्री स्वर्गीय साबीर भाई शेख यांचीही पुण्यतिथी आहे हा एक उत्तम योगायोग आहे. साबीरभाईंनी आयुष्यभर गुरुवर्यांप्रती आदरभाव व्यक्त केला. गुरुवर्यांना अपेक्षित असे शेती शिक्षणातून ग्रामोद्धाराचे कार्य आपण सर्वांनी निष्ठेने केले पाहिजे."


या श्रद्धांजली सभेत मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी आणि डॉक्टर लहू गायकवाड यांनी संपादित केलेल्या 'ज्ञानऋषी गुरुवर्य रा.प.सबनीस'या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे

पुणे फेस्टिव्हलमध्ये 'नृत्य झंकार' स्पर्धा दैठणकर यांना 'नृत्यगुरू' पुरस्कार

पुणे : दैनिक संध्या



पुणे फेस्टिव्हलतर्फे 'नृत्य झंकार' हि महिलांची नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. हि स्पर्धा शनिवार, दि. १७ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होईल. यामध्ये ज्येष्ठ भरतनाट्य नृत्यगुरू स्वाती दैठणकर यांना पुणे फेस्टिव्हल 'नृत्यगुरू पुरस्कर' देऊन गौरवले जाणार आहे. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहे. पुणे फेस्टिव्हलच्या चेअरपर्सन मीरा सुरेश कलमाडी, मुख्य संयोजक ॲड.अभय छाजेड, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक व सेक्रटरी डॉ. सतीश देसाई याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती पुणे फेस्टिव्हल नृत्य झंकार स्पर्धा आयोजक संयोगिता कुदळे यांनी दिली. डॉ. स्वाती दैठणकर आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम् नृत्यांगना आहेत. त्या मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर असून संपूर्ण विद्यापीठामध्ये सर्व प्रथम आल्याबद्दल त्यांना सुवर्ण पदक व विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले.भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती तसेच संशोधन शिष्यवृत्ती त्यांना मिळालेली आहे. त्यांच्या नृत्ययोग विषयावर आधारे युनिव्हर्सिटी मध्ये चार वर्षांचा डिग्री कोर्स सुरू झाला असून हा सन्मान लाभलेल्या त्या पहिल्याच नर्तिका ठरल्या आहेत. सध्या डॉ. डी. वाय. पाटील युनिवर्सिटी मध्ये त्या पर्फोरामिंग आर्ट्सच्या प्रमुख म्हणून पदभार सांभाळीत आहेत. या पुणे फेस्टिव्हल नृत्य झंकार स्पर्धेत एकल आणि समूह नृत्य अशा दोन प्रकारांचा समावेश आहे. एकल नृत्य स्पर्धा २० ते ३५ आणि ३६ ते ५० वर्षे अशा दोन वयोगटांत होणार आहे.



श्री महासरस्वती देवीला स्फटिक माळ, तर श्री महाकाली देवीला रुद्राक्ष माळ अर्पण

पुणे : दैनिक संध्या

सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिरात सुरू असलेल्या सार्वजनिक नवरात्रोत्सव २०२६ निमित्त भक्तिमय वातावरणात श्री महासरस्वती देवीच्या चरणी पवित्र स्फटिक माळ, तर श्री महाकाली देवीच्या चरणी रुद्राक्ष माळ अर्पण करण्यात आली. श्री महालक्ष्मी मंदिरात श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या तीन रूपांची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या तिन्ही देवींचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. ज्ञान, विद्या, बुद्धी आणि निर्मळतेचे प्रतीक असलेल्या श्री महासरस्वती देवीला स्फटिक माळ अर्पण करण्यात आली. स्फटिक हे पवित्रता, शांतता आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानले जाते. तर शक्ती, साहस आणि दुष्ट प्रवृत्तींच्या संहाराचे प्रतीक असलेल्या श्री महाकाली देवीला रुद्राक्ष माळ अर्पण करण्यात आली. रुद्राक्षाला हिंदू धर्मपरंपरेत विशेष आध्यात्मिक महत्त्व असून त्याचा भगवान शिवाशी घनिष्ठ संबंध मानला जातो. नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वात देवींच्या चरणी करण्यात आलेले हे माळार्पण श्रद्धा, भक्ती आणि भारतीय आध्यात्मिक परंपरेचे दर्शन घडविणारे ठरले. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे सुरू असलेल्या सार्वजनिक नवरात्रोत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवींचे दर्शन घ्यावे, असे आवाहन मंदिराच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

नवी दिशा नवे भान : या विषयावर व्याख्यान संपन्न

पुणे : दैनिक संध्या

सखी सावित्री समिती अंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कनिष्ठ विभागातर्फे बुधवार दि. १४/१०/२०२६ रोजी माननीय प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली "नवी दिशा नवे भान" या विषयावर वरिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्रा.डॉ.सुनंदा शेळके यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर व्याख्यानात प्रा.डॉ.सौ सुनंदा शेळके यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी परिस्थितीचे आणि वेळेचे भान, करिअर निवडीच्या संधी, आर्थिक स्थितीची जाणीव आणि वाचनाचे जीवनातील महत्त्व याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. बेंजामिन कार्सन अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यातून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी विचार मांडले. तसेच विद्यार्थ्यांना आत्मनिरीक्षण करण्याचा सल्ला देखील दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा.गोरखनाथ मोरे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचाल करताना अभ्यासाबरोबरच सामाजिक जाणीव याचे देखील भान ठेवावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक प्रा.सौ.जयमाला पवार, आभार प्रदर्शन प्रा.अश्विनी काकडे आणि सूत्रसंचालन प्रा. सोनल ब्राह्मणकर यांनी केले.व्याख्यान यशस्वी होण्यासाठी प्रा. अनिता पवार यांनी सहकार्य केले. सदर व्याख्यानासाठी पर्यवेक्षक प्रा.संजय शेंडे आणि वाणिज्य शाखा समन्वयक प्रा.रमेश गोसावी उपस्थित होते.

फोक्सवॅगननेच्या परफॉर्मन्सने गाजवले केंद्रस्थान

पुणे : दैनिक संध्या

फोक्सवॅगनने इंडियाने कोयंबतूर येथील कोस्ट येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या फोक्सवॅगनने एक्सपिरियन्सेस ट्रॅक डे उपक्रमाची यशस्वी सांगता केली. परफॉर्मन्स, ड्रायव्हिंगची आवड आणि समुदायभावना यांचा अनोखा उत्सव साजरा करण्यासाठी मालक आणि वाहनप्रेमी प्रथमच अशा स्वरूपात एकत्र आले. भारतातील फोक्सवॅगननेच्या उत्साही ग्राहकवर्गाचे मजबूत आकर्षण अधोरेखित करत, या कार्यक्रमासाठीची नोंदणी अवघ्या एका दिवसाहून थोड्याच अधिक कालावधीत पूर्ण झाली. देशभरातील ग्राहकांनी या अनुभवाचा भाग होण्यासाठी उत्साहाने नोंदणी केली. गोल्फ जीटीआय, व्हर्टस जीटी, टायगुन जीटी, पोलो जीटी, टेरॉन आर-लाइन आणि टिगुआन आर- लाइन या मॉडेल्सच्या मालकांना एकत्र आणत, व्हीडब्ल्यूई ट्रॅक डे ची संकल्पना फोक्सवॅगनने ब्रँडची ओळख बनलेल्या लोकांमधील नाते, उत्कटता आणि परफॉर्मन्सचा समृद्ध वारसा यांचा उत्सव साजरा करण्यासाठी साकारण्यात आली. दोन दिवसांच्या या अनुभवात मालकांना व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित करण्यात आलेल्या रेसट्रॅकच्या वातावरणात त्यांच्या वाहनांच्या क्षमतांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. याचबरोबर, ड्रायव्हिंगची आवड आणि फोक्सवॅगनने ब्रँडबद्दल समान प्रेम असलेल्या इतर वाहनप्रेमींशी संवाद साधण्याची संधीही त्यांना मिळाली.

आबासाहेब अत्रे प्रशालेत विद्यार्थ्यांसाठी जलकुंभ

विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा : आर आर काबिल आणि निरंजन सेवाभावी संस्थेच्या पुढाकारातून दोन शाळांमध्ये जलकुंभ

■ पुणे : (दै. संध्या)



विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध होणेही महत्त्वाचे आहे. याच जाणिवेतून विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि त्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आर आर काबिल आणि निरंजन सेवाभावी संस्थेच्या पुढाकारातून पुण्यातील दोन शाळांमध्ये जलकुंभ उभारण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन सोमवार पेठेतील आबासाहेब अत्रे प्रशालेत झाले.

आर आर ग्लोबलच्या संचालिका कीर्ती काबरा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सेफ पॅक इंडस्ट्रीजच्या संचालिका अंजली तापडिया प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी नीलम परतानी, अभय करवा, भारत वेदपाठक, संजीव महाजन, सतीश बजाज, प्रसाद बजाज, गणेश सारडा, श्रीराम परतानी, नवल भुतडा आणि वेन्सी डाबरे उपस्थित होते. आर आर काबिलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत नगर जिल्ह्यातील दोन, बीड जिल्ह्यातील दोन आणि पुण्यातील चार अशा एकूण आठ शाळांमध्ये जलकुंभ उभारण्यात आले आहेत. या उपक्रमासाठी अंदाजे ४० लाख रुपये खर्च करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

कीर्ती काबरा म्हणाल्या, सोशल मीडियाच्या काळात विद्यार्थ्यांनी लक्ष विचलित होऊ न देता शिक्षणाच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करायला हवे. देशाचे भविष्य असलेल्या विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकांच्या आयुष्यात प्रकाश आणणाऱ्या रोशनी उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासाचे उपक्रम राबविण्यात येतात तसेच शिष्यवृत्तीही दिली जाते.

अंजली तापडिया म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी स्वच्छ पिण्याचे पाणी ही अत्यावश्यक मूलभूत सुविधा आहे. शाळांमध्ये जलकुंभ उभारल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी उपलब्ध होणार असून, त्यांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मदत होईल. आर आर काबिलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेला हा स्तुत्य उपक्रम असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासोबतच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.संजीव महाजन म्हणाले, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे हे शताब्दी वर्ष असून, या निमित्ताने आर आर काबिलच्या माध्यमातून योग्य ठिकाणी मदतीचा हात देण्यात आला आहे. सर्वांनी एकत्रितपणे मदत केल्यास समाजातील तळागाळातील मुलांना चांगले शिक्षण आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देता येतील.

बँक ऑफ बडोदाकडून मुंबईत एमएसएमई ग्राहक संपर्क कार्यक्रमाचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीच्या बँकांपैकी एक असलेल्या बँक ऑफ बडोदाने 13 ऑक्टोबर, 2026 रोजी मुंबईत एमएसएमई (MSME) ग्राहक संपर्क कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात 200 हून अधिक एमएसएमई उद्योजक आणि व्यावसायिक सहभागी झाले. एमएसएमई समुदायासोबत बँकेचा संवाद अधिक दृढ करणे आणि उद्योजकांना बँकेच्या सर्वसमावेशक आर्थिक उपाययोजना तसेच बँकिंग सेवांची माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

बँक ऑफ बडोदाचे मुख्य महाव्यवस्थापक आणि एमएसएमई बँकिंग, को-लेंडिंग आणि सप्लाय चेन फायनान्स विभागाचे प्रमुख श्री. सुनील कुमार शर्मा; मुख्य महाव्यवस्थापक व मुंबई अंचल प्रमुख श्री. मधुर कुमार; 'न्यू एमएसएमई बिझनेस'चे प्रमुख श्री. ध्रुबाशिष भट्टाचार्य; मुंबई अंचल चे महाव्यवस्थापक (व्यवसाय विकास) श्री. राजेश कुमार शर्मा; मुंबई मेट्रो मध्य क्षेत्राचे उप-महाव्यवस्थापक आणि क्षेत्रीय व्यवस्थापक श्री. संजीव बन्सल आणि मुंबई मेट्रो दक्षिण क्षेत्राचे उप-महाव्यवस्थापक व क्षेत्रीय व्यवस्थापक श्री. विमलेश झालानी या कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना, वरिष्ठ नेतृत्वाने नावीन्यपूर्ण आर्थिक उपाययोजना, सुलभ बँकिंग प्रक्रिया आणि तंत्रज्ञान-आधारित सेवांच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करण्याच्या बँक ऑफ बडोदाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

सासवड येथे सर्वात मोठ्या उपनगरीय ऑटोमोबाइल सर्व्हिस सेंटरचे केले उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



पुणे (महाराष्ट्र), ऑक्टोबर १५, २०२६: पीपीएस मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाइल रिटेल समूहाने पुण्यातील सासवड येथे नवीन महिंद्रा सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन केले. यामुळे महाराष्ट्रातील त्यांची उपस्थिती अधिक दृढ झाली आहे, तसेच या भागातील ग्राहकांसाठी दर्जेदार वाहन सेवेची उपलब्धता सुलभ झाली आहे. महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी जसे कस्टमर केअर अँड सीएक्सचे एसव्हीपी आणि हेड सेल्स पवन कुमार, कस्टमर केअरचे व्हीपी आणि हेड सचिन गुप्ता, झोनल हेड कस्टमर केअर - वेस्ट झोन मनोज कुमार, आरसीसीएम - पुणे रिजन समिरा महापात्रा, तसेच पीपीएस ग्रुपचे सीईओ, पीपीएस- महिंद्रा (महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ) सुप्रीत आर., चीफ ऑफ स्टाफ पक्षल शाह, सीओओ, पीपीएस- महिंद्रा महाराष्ट्र इन्शा मसीह आणि दोन्ही कंपन्यांमधील इतर वरिष्ठ प्रतिनिधींच्या उपस्थितीत या सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. पीपीएस ग्रुपचे भारतातील १५१ वे महिंद्रा टचपॉईंट असलेले हे नवीन वर्कशॉप पुणे आणि आसपासच्या परिसरातील त्यांचे नेटवर्क ९ महिंद्रा टचपॉईंट्सपर्यंत वाढवते. सासवडजवळील खालद येथे नव्याने उद्घाटन करण्यात आलेले हे अत्याधुनिक पीपीएस मोटर्स वर्कशॉप २५,४०० चौरस फूट जागेवर पसरलेले आहे.

'सेवा संकल्पा'ला गती; महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा लाभार्थ्यांशी थेट संवाद!

■ पुणे (दै. संध्या)

सेवा संकल्प अभियान हे केवळ महिन्याभरापुरते मर्यादित न राहता त्यातील गतिमानता आणि ग्राहकाभिमुख सेवेची संस्कृती महावितरणच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने कायमस्वरूपी अंगीकारावी, असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (दि. १६) केले. या अभियानात प्रत्येक तालुक्यात एकाच ठिकाणी सर्व ग्राहकसेवा व विविध योजनेतील सहभागाची सुविधा उपलब्ध होत आहे. त्याचा वीजग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे श्री. लोकेश चंद्र यांनी कल्याण, चंद्रपूर, नाशिक, कोल्हापूर, भांडूप व पुणे येथील विशेष सेवा कक्षांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधत प्रतिक्रिया जाणून घेतल्या. या अभियानाला वीजग्राहकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची अभियानातील गतिमानता कौतुकास्पद असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर, ग्रामीण विद्युतीकरण कॉरपोरेशनचे कार्यकारी संचालक श्री. सौम्या कांत, महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत व श्री. चंद्रमणी मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक व घटनात्मक पदावरील २५ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त महावितरणकडून प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रातिनिधिक स्वरूपात काही परिमंडलांचा आढावा घेतला. यावेळी पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप, नवीन वीजजोडणी, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजनेचे प्रातिनिधिक लाभार्थी सुशील जयप्रकाश पाटील, गजराबाई सुला वरडे, आनंद सरदेशमुख, धीरज पत्रू नैताम गजानन घाग व बाळासाहेब नदाफ (कोल्हापूर शहर), सुनील रामभाऊ बरड (सावरोली, ता. खालापूर, जि. रायगड) तसेच बँक प्रतिनिधींशी थेट संवाद साधला.

२०,००० महिलांना विमा सल्लागार म्हणून काम करण्याची संधी

■ पुणे (दै. संध्या)

'आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स'ने 'नारीशक्ती' या आपल्या उपक्रमांतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत देशभरात २०,००० महिला विमा सल्लागारांची भरती करण्याचे ठरविले आहे. नवरात्रीच्या निमित्ताने कंपनीने ही घोषणा आज येथे केली. कंपनीला विमा प्रतिनिधींच्या माध्यमातून मिळणाऱ्या व्यवसायापैकी ४५ टक्के व्यवसाय हा ७८,००० हून अधिक महिला विमा सल्लागारांकडून मिळतो, असे ३० सप्टेंबर २०२६ रोजीच्या कंपनीकडील आकडेवारीनुसार दिसून येते. कंपनीच्या 'नारीशक्ती' उपक्रमाला दोन वर्षे पूर्ण होत आहे. त्या अनुषंगानेही महिला विमा सल्लागारांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली आहे.

'आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेड'चे मुख्य वितरण अधिकारी अमिश बँकर म्हणाले, "आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स'मध्ये आम्ही स्त्री आणि पुरुष असा भेद न करता प्रत्येकाच्या कौशल्याला महत्त्व देतो. आमच्या पुरुष विमा सल्लागारांची कामगिरीही सुधारत आहे. मात्र, ग्राहकांच्या गरजा आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी आमच्या महिला विमा सल्लागार विशेष प्रयत्न करीत असल्याचे आम्ही पाहत आहोत..

महत्त्वाची बाब म्हणजे, ३० सप्टेंबर २०२६ रोजी कंपनीच्या एकूण विमा सल्लागारांपैकी सुमारे ३२ टक्के महिला होत्या. कंपनीच्या विमा प्रतिनिधींच्या माध्यमातून मिळणाऱ्या एकूण व्यवसायापैकी सुमारे ४५ टक्के व्यवसाय या महिला सल्लागारांकडून मिळत आहे.

पोलीस क्षेत्रात महिला पोलिसांचे कर्तृत्व पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे

पोलीस सह आयुक्त संजय दराडे ; श्री महालक्ष्मी मंदिरात कर्तृत्ववान महिला पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

■ पुणे :(दै. संध्या)



पोलीस दलातील महिला अधिकारी आणि कर्मचारी दिवस-रात्र पुणेकरांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असतात. पोलीस दलातील धावपळीच्या आणि आव्हानात्मक नोकरीसोबतच त्या घराची जबाबदारीही समर्थपणे सांभाळतात. पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या पोलीस क्षेत्रात कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे आहे. असे प्रतिपादन पोलीस सह आयुक्त संजय दराडे यांनी केले.

सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या वतीने कर्तृत्ववान महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा संजय दराडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता राजकुमार अग्रवाल, उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती भरत अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, युवराज लाहोटी यांसह विशाल सोनी आदी उपस्थित होते.

संजय दराडे म्हणाले, पोलीस दलात गेल्या २० वर्षांपासून महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण आहे. पोलीस दलातील कर्तव्याचे स्वरूप आव्हानात्मक असून, २४ तास दक्ष राहावे लागते. कधीही फोन येऊ शकतो आणि तातडीने कर्तव्यावर हजर व्हावे लागते. अशा परिस्थितीतही महिला पोलीस अधिकारी कुटुंबातील जबाबदाऱ्या पार पाडून विभागाचे कर्तव्य बजावतात. डॉक्टरांची ओपीडी रात्री थांबते; मात्र महिला पोलिसांचे काम २४ तास सुरू असते. या आव्हानांना सामोरे जात त्या धैर्याने आणि खंबीरपणे काम करतात.

भरत अग्रवाल म्हणाले, नवरात्रोत्सवात देवीचा जागर केला जातो. यानिमित्ताने समाजाच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या या कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्याची संधी मिळाली. महिलांना कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळाल्यास त्या पुरुषांनाही मागे टाकू शकतात. अनेक क्षेत्रांत महिलांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे.

या वेळी अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, सहायक पोलीस आयुक्त अनिता मोरे, नूतन पवार, नम्रता देसाई, स्वप्ना बोकील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनिक, अश्विनी सातपुते, माया देवरे, रुणाल मुल्ला, सुनीता नवले, प्रियंका गोरे, सहायक पोलीस निरीक्षक शरयू देशमुख, संजना काकडे तसेच वाहतूक शाखेतील पोलीस अंमलदार यांचा सन्मान करण्यात आला.

थोडक्यात पण महत्वाचे



विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची दुय्यम निबंधक कार्यालयास अभ्यासभेट

नारायणगाव : दैनिक संध्या

राजगुरुनगर येथील सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालयातील एल.एल.बी. तृतीय वर्ष आणि बी.ए. एल.एल.बी. पाचव्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सह. दुय्यम निबंधक खेड क्र.३ या कार्यालयास अभ्यासभेट देऊन कार्यालयाच्या कामकाजाची माहिती घेतली. सदर अभ्यासभेट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील, खजिनदार सुरेखाताई मोहिते पाटील, सचिव शिवाजीराव मोहिते पाटील, प्राचार्य प्रा.डॉ.किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी दुय्यम निबंधक व्ही.एस.पाटील, प्रा.संदीप तायडे, प्रा.संदीप दरेकर, यांसह विद्यार्थी उपस्थित होते. या भेटीदरम्यान दुय्यम निबंधक व्ही.एस.पाटील सो. यांनी विद्यार्थ्यांनी दस्त नोंदणी प्रक्रिया, खरेदीखत व इतर दस्तांची नोंदणी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कायदे आणि नवीन बदल, तसेच मालमत्तेच्या व्यवहारांशी संबंधित प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया यांविषयी माहिती दिली. कायद्याच्या अभ्यासक्रमात पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कामकाजाची माहिती असणे महत्त्वाचे आहे. अशा अभ्यासभेटींमुळे विद्यार्थ्यांना कायद्याची अंमलबजावणी, दस्त नोंदणीतील प्रक्रिया आणि नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे महत्त्व समजण्यास मदत झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या अभ्यासभेट दरम्यान प्रा. संदीप तायडे, प्रा. संदीप दरेकर यांनी विद्यार्थ्यांना दस्त नोंदणी कामकाजाची माहिती दिली. तसेच दुय्यम निबंधक पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आभार मानले.

मांजरवाडीत श्री मुक्ताई पतसंस्थेची पहिली सर्वसाधारण सभा उत्साहात

नारायणगाव: दैनिक संध्या

मांजरवाडी येथील श्री मुक्ताई नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर भीमाजी जाधव, उपाध्यक्षपदी विलास रभाजी खंडागळे, तर सचिवपदी दत्तात्रय मुक्ताजी खंडागळे यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाची निवड जाहीर करण्यात आली. मांजरवाडी येथे संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा मुख्य प्रवर्तक दत्तात्रय खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत संस्थेच्या कामकाजाला सुरुवात करण्यासाठी पहिल्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या कार्यकारी मंडळात अध्यक्ष चंद्रशेखर जाधव, उपाध्यक्ष विलास खंडागळे आणि सचिव दत्तात्रय खंडागळे यांच्यासह संचालक म्हणून नवनाथ बारवे, अक्षय वाव्हळ, बाळासाहेब राजगुरू, सुवर्णा मुळे, संजय कोऱ्हाळे, एकनाथ डुकरे, अनुजा हिंगे, संतोष तांबे, वैजयंती कोऱ्हाळे यांची निवड करण्यात आली. तसेच अर्जुन पाटील यांची सल्लागार म्हणून निवड करण्यात आली. यावेळी अनुष्का झांबरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालक मंडळाचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

मंगल कार्यालयांना नगरपरिषदेचा दणका; पार्किंगसाठी १५ नोव्हेंबरची डेडलाइन!

आळंदी : दैनिक संध्या

शहरातील मंगल कार्यालये, लॉन्स आणि सभागृहांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी नगरपरिषदेने कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. सर्व मंगल कार्यालयांनी १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पार्किंगची पुरेशी व्यवस्था करावी, अशी अंतिम मुदत प्रशासनाने दिली आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या कार्यालयांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मंगल कार्यालयांच्या मालक आणि व्यवस्थापकांची नगरपरिषदेत १५ ऑक्टोबर रोजी संयुक्त बैठक झाली. मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, किरण येळवंडे, आकाश जोशी, विवेक घुंडरे, वासुदेव तुर्की, तुषार नेटके आणि वाहतूक पोलीस निरीक्षक उपस्थित होते. पार्किंगचा अभाव, वाहतूक नियोजन, परवाने, पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापन या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. विवाह सोहळ्यांमुळे वाहतुकीवर अतिरिक्त ताण येत असल्याने संबंधित कार्यालयांनी कार्यक्रमाच्या एक दिवस आधी वाहतूक विभागाला लेखी माहिती द्यावी, अशी सूचना पोलिसांनी केली. आवश्यकतेनुसार अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात करता येतील. शहराबाहेर पार्किंगची व्यवस्था करण्याचाही पर्याय सुचविण्यात आला. कार्यालयाच्या पार्किंग क्षमतेनुसार कार्यक्रमांचे नियोजन करण्याची गरजही बैठकीत अधोरेखित करण्यात आली. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सर्व कार्यालयांनी नगरपरिषदेचा आवश्यक व्यवसाय ना-हरकत परवाना घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. १५ नोव्हेंबरनंतर कार्यालयांचे सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार नोटिसा बजावण्यात येतील. धर्मशाळांमध्ये विवाह सोहळे आयोजित होत असल्यास संबंधित प्रकरण धर्मादाय आयुक्तांकडे पाठविण्याबाबत कार्यवाही केली जाणार आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच आगामी सर्वसाधारण सभेत मंगल कार्यालयांसाठी लागू असलेल्या अटी व शर्तींचा आढावा घेऊन सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक सुधारणा करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

अवैध माती वाहतुकीने रस्त्यांची चाळण!

शिरूर : दैनिक संध्या

दौंड तालुक्यातील विविध गावांमधून कथितरीत्या अवैध माती उपसा करून शिरूर तालुक्यातील रांजणगाव सांडस परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या माती वाहतुकीसाठी दररोज मोठ्या संख्येने ओव्हरलोड हायवा व डंपर धावत असल्याने रांजणगाव सांडस ते नागरगाव फाटा या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दौंड तालुक्यातील वाळकी व पिराचीवाडी परिसरातील शेतजमिनींमधून जेसीबीच्या सहाय्याने माती उपसा केला जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या मातीची रॉयल्टी पावती नसतानाही दररोज सुमारे ५० ते ६० हायवांमधून रांजणगाव सांडस परिसरात वाहतूक होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे रस्त्याची अवस्था खराब होण्याबरोबरच परिसरात दिवसभर धुळीचे लोट उठत आहेत. रांजणगाव सांडस येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्य चौकात असल्याने माती वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. शाळेच्या परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. ओव्हरलोड वाहनांमधून रस्त्यावर माती सांडत असल्याने दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे. दोन दिवसांपूर्वी मातीवरून दुचाकी घसरून एक वाहनचालक किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली. अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.



माहूर माध्यमिक विद्यालयात नवरात्रोत्सवानिमित्त भोंडला कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ काळदरी (दै. संध्या)

माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त विद्यार्थिनींच्या पारंपरिक कलागुणांना वाव देण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने भोंडला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमातून विद्यार्थिनींना पारंपरिक सण-उत्सवांची माहिती मिळाली, तसेच सामूहिक सहभाग, आनंद आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीचा जागर करणारा आणि आदिशक्तीच्या उपासनेला समर्पित असलेला महत्त्वपूर्ण सण आहे. या उत्सवाच्या निमित्ताने शाळेत आयोजित करण्यात आलेल्या भोंडला कार्यक्रमामुळे शालेय परिसरात आनंददायी आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले. भोंडला हा महाराष्ट्रातील एक पारंपरिक लोकउत्सव असून, विशेषतः मुली आणि महिलांकडून तो मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या परंपरेतून निसर्गाविषयी कृतज्ञता, मैत्री, एकोपा आणि सामूहिक आनंदाची भावना व्यक्त होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी पारंपरिक पद्धतीने भोंडल्याची गाणी सादर केली. फेर धरून, तालबद्ध टाळ्यांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला. पारंपरिक लोकगीतांच्या माध्यमातून जुन्या सांस्कृतिक परंपरांची ओळख नव्या पिढीला करून देण्यात आली.

आधुनिकतेच्या युगात लोप पावत चाललेल्या लोकपरंपरांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि त्यांच्यामध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच विविध सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्वाचे स्थान असते. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळतो आणि समूहभावना विकसित होते. भोंडला कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आपल्या परंपरा जपण्याची संधी मिळाली. कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचा उत्साह आणि आनंद पाहून शालेय परिसरात चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले.माहूर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा वारसा अनुभवता आला. शालेय स्तरावर अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परंपरा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होण्यास मदत होते. अशा प्रकारे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला भोंडला कार्यक्रम आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमातून 'परंपरेचे जतन, संस्कृतीचे संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत लोककलेचा वारसा पोहोचवणे' हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, त्याचप्रमाणे गावातील असंख्य महिला उपस्थित होत्या. विद्यालयातील शिक्षक महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, इंद्रभान पठारे, विकास राऊत श्रीकांत गव्हाणे इ. कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते .

पर्यावरण संवर्धनासाठी 'किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज'चा पुढाकार

■ जेजुरी : (दै. संध्या)

कास्टिंग्ज आणि पिग आयर्न उत्पादन क्षेत्रातील भारतातील आघाडीच्या कंपन्यांपैकी एक असलेल्या 'किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड'च्यावतीने महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरीतील श्री कडेपठार गडावर कडेपठारावर नैसर्गिक हिरवळ व पर्यावरणाचे दीर्घकालीन संवर्धना साठी तीन हजार वृक्षांची लागवड करण्यात आली.

कंपनीच्या या उपक्रमामध्ये भोकर, आवळा आणि चिंच यांसह ११ प्रकारच्या स्थानिक झाडांची ३,००० हून अधिक रोपे लावण्यात आली. १४ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ही मोहीम राबवण्यात आली. यातून पर्यावरणाचे रक्षण, जैवविविधतेचे जतन आणि शाश्वत विकास यांसाठीची कंपनीची बांधिलकी अधोरेखित झाली. श्री खंडोबा देवता आणि लिंग कडेपठार ट्रस्ट यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला. कडेपठार ते जेजुरी खंडोबा मंदिर यांना जोडणाऱ्या सुमारे तीन किलोमीटरच्या पायवाटेच्या दुतर्फा.या कार्यक्रमात 'केएफआयएल'चे कर्मचारी, वन विभागाचे प्रतिनिधी, तसेच नाझरे येथील श्री नागेश्वर विद्यालयातील सुमारे ६० विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी भाग घेतला.



या उपक्रमाविषयी बोलताना 'किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड'चे कार्यकारी संचालक निशिकांत एकतारे यांनी "केवळ वृक्षारोपण म्हणजे पर्यावरण संवर्धन, असे 'किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज'मध्ये आम्ही मानत नाही.

पुढील अनेक पिढ्यांनाही लाभ मिळेल अशा परिसंस्था निर्माण करणे आणि त्यांचे जतन करणे हे उदिष्ट असून या उपक्रमात स्थानिक प्रजातींच्या झाडांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे येथील जैवविविधतेचे संवर्धन होईल. तसेच, या भागातील वनस्पती आणि प्राण्यांच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण होईल. पर्यावरणीय समतोल राखण्यासही मदत होईल. कडेपठार येथे भाविक, पर्यटक आणि स्थानिक नागरिक यांच्यासाठी अधिक हिरवेगार व आल्हाददायक वातावरण निर्माण करण्याकरीता स्थानिक संस्था आणि नागरिकांसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा आम्हाला आनंद आहे." या उपक्रमाला वन विभागाच्या प्रतिनिधी दीपाली शिंदे आणि धनंजय देवकर मंदिर ट्रस्टचे विश्वस्त मयूर दिदभाई, ऋषिकेश सातभाई आणि सदानंद सुरेश बारभाई यांनी सहकार्य केले.

या उपक्रमात केएफआयएल'च्या वतीने मुख्य परिचालन अधिकारी पी. एम. मनोजकुमार, जेजुरी कारखान्याचे प्रमुख पी. सत्यमूर्ती आणि मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख झाकीर शेख यांचा समावेश होता.

ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल 2026: इको आणि फायर टीव्ही 45% पर्यंत सूट

■ मुंबई : (दै. संध्या)

ॲमेझॉन चा ग्रेट इंडियन फेस्टिव्हल 2026 आता लाईव्ह झाला असून इको स्मार्ट स्पीकर आणि स्मार्ट डिस्प्ले, फायर टीव्ही स्ट्रीमिंग स्टिक्स तसेच अंगभूत असलेल्या स्मार्ट टीव्हीवर आकर्षक ऑफर्स उपलब्ध आहेत. दिवसेंदिवस शूरवीर असोसिएशन आवाज नियंत्रण शांती सोपी शांतता, टीव्ही वरील प्रवाहात आणखी उत्तम बनवूटो असोसिएशन तुमचे स्मार्ट होम अनुभव किंवा व्यवस्थापित असोसिएशन, प्रत्येकासाठी काही खास ऑफर उपलब्ध आहे.

या सणासुदीच्या वाहिनीत कोणतेही इको स्मार्ट स्पीकर, स्मार्ट डिस्प्ले किंवा फायर टीव्ही स्टिक खरेदी करा आणि अगदी नवीन ॲलेक्स+ चा लवकर प्रवेश मोफत मिळवा. अलेक्सा+ ही ॲमेझॉनची जनरेटिव्ह एआय-आधारित वैयक्तिक सहाय्यक आहे, जी अधिक संवादात्मक, अधिक, वैयक्तिक गरजानुरूप सानुकूलित, खऱ्या अर्थाने भारतीय वापरासाठी तयार करण्यात आले असून वास्तविक कामांमध्येही क्रिया करू शकते.

फायर टीव्हीसाठी आणि 4K स्ट्रीमिंगसाठी एच स्टिक आणि अधिक लवकर आणि त्वरीत स्ट्रीमिंगसाठी नवीन ब्लॉकबस्टर के व्यतिरिक्त इतर शो देखील, फायर टीव्ही स्टिक प्रइम व्हिडिओ, नेटफ्लिक्स, जियोहॉटस्टार, यूट्यूब, झी5



आणि इतर लोकप्रिय कंटेंट प्रोवाइडर, वेरिल लाखो फॉनल आणि टीव्ही शोच्या एपिसोड स्ट्रीमची सुविधा देते (सदस्यता शुल्क लागू शकते) याशिवाय, कंसोल ची गेर नस्ताना तुम्ही फायर टीव्हीद्वारे थॉट एक्सबॉक्स क्लाउड गेमिंग चा आनंदही गेऊ शकत नाही (यासोबत एक्सबॉक्स गेम पास करणे आवश्यक आहे) ॲलेक्सा व्हॉइस रिमोट च्या, तुम्ही अलेक्सा किंवा ॲलेक्सा+ ला विचारून सामग्री शोधू शकता आणि प्ले करू शकता. उदाहरणार्थ, अलेक्सा+ ला विचार, "वो कौन सी पिक्चर थी थी आलिया भट्ट ने बंगाली पत्रकाराची भूमिका?" "आणि ती तुमच्यासाठी तो शोधून काढेल. या सर्व ऑफर्स आणि आणखी बरेच काही ॲमेझॉन.इन वर एक्सप्लोर करा आणि इको व फायर टीव्ही सोबत तुमचा सणासुदीचा हंगाम अधिक आनंददायी बनवा. ग्राहकांना ॲमेझॉन.इन वर बँक ऑफर्सद्वारे अतिरिक्त सवलतींचा लाभ घेता येईल.

जेजुरी मर्दानी दसऱ्याच्या नियोजन बैठकीत ग्रामस्थ मंडळाचा ट्रस्टी विरोधात संताप

■ जेजुरी (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र जेजुरी येथील खंडोबा गडकोटामध्ये नवरात्र उत्सव सुरू असून जेजुरीच्या मर्दानी दसऱ्याची जोरदार तयारी संदर्भातील ग्रामस्थ खान्देकरी मानकरी यांच्या पारंपरिक छत्री मंदिर येथील बैठकीत श्री मार्तंड देवसंस्थांनाच्या पंचकमिटीच्या मनमानी कारभारा बद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात आला असून जेजुरीगडावर ग्रामस्थ मानकरी मंडळाचा नामफलक न लागल्यास आणि योग्य ते सहकार्य न झाल्यास सदर ट्रस्ट कमिटी सदस्यांना जेजुरीगडावर प्रवेश बंदी करणार असल्याचे काही ग्रामस्थांनी संताप व्यक्त करताना म्हंटले आहे.

परंपरा आणि रितिरिवाजा प्रमाणे दसरा साजरा करण्याकरिता ग्रामस्थ आज पर्यंत बैठक नियोजन करत असतात यात समस्त ग्रामस्थ अठरा पगड जाती धर्माचे लोक सामील होतं असतात. दसऱ्याच्या दिवशी कडेपठार मंदिरातून व खंडोबा गडकोटातून पालखी सोहळे सोने लुटण्यासाठी कडेपठार डोंगरामध्ये येतात. यालाच मर्दानी दसरा म्हणतात.



यावेळी दोन्ही पालख्यांची भेटा - भेट होते. या दोन्ही पालख्यांच्या सोहळ्याच्या तयारीसाठी समस्त खांदेकरी मानकरी, ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी, मार्तंड देव संस्थांचे विश्वस्त, प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांची बैठक गौतमेश्वर मंदिरात (छत्री मंदिर) येथे गुरुवारी आयोजित करण्यात आली होती. मंगळवार दिनांक 20 रोजी विजयादशमी दसरा असल्याने सायंकाळी सहा वाजता खंडोबा देवाच्या मर्दानी दसऱ्याला प्रारंभ होणार आहे.

मुख्य इनामदार सचिन पेशवे, राजेंद्र पेशवे यांनी पालखी सोहळ्यास (शेडा) हुकूम दिल्यानंतर सोहळ्यास प्रारंभ होतो. यानंतर भंडार गृहातून उत्सव मूर्ती पालखीमध्ये ठेवण्यात येतात. मध्यरात्री एक ते दोनच्या दरम्यान दोन्ही पालख्यांची भेट होतं असते. यावेळी पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत, मंदिर संस्कृती उपासक गुरव कोळी वीर घडशी,जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, मार्तंड देव संस्थांचे मुख्य विश्वस्त विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे, अभिजीत देवकाते नगरपालिकेचे लेखापाल बाळासाहेब खोमणे, समस्त ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, सुधीर गोडसे, महादेव माळवदकर, अनिल झगडे, दत्ता सकट, छबन कुदळे, गणेश थोरात, शैलेश राऊत, अशोक खोमणे, संतोष दोरगे, कुंडलिक दावलकर, कृष्णा कुदळे, संतोष खोमणे, समीर मोरे, रामभाऊ माळवदकर, खंडू भालेराव, महादेव बारभाई, भागोजी खोमण कडेपठार देवता लिंग ट्रस्टचे मयूर दीडभाई, माणिक पवार, सुभाष राऊत, समस्त खांदकरी मानकरी मंडळाचे पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वस्त व ग्रामस्थांमध्ये शाब्दिक वाद - कडेपठार येथील पालखी सोहळा ससुरटिंगी येथील टेकडीवर जाताना पायरी मार्गाचे काम अपूर्ण आहे. या परिसरात खांदेकऱ्यांची दमछाक होते. या अवघड टप्प्यातील पायरी मार्गाचे काम त्वरित पूर्ण करावे तसेच कडेपठार मंदिरात नगरखाण्याचे काम त्वरित सुरू करण्यात यावे. याबाबत कडेपठार देवता लिंग ट्रस्टच्या विश्वस्तांनी गांभीर्याने दखल घ्यावी.

खंडोबा गडकोटामध्ये पुरातत्व खात्याच्या वतीने शेकडो कोटी रुपयांची जीर्णोद्धाराची कामे सुरू आहेत. ही कामे निकृष्ट दर्जाची असून याबाबत त्वरित चौकशी करावी, ट्रस्टी रस्त्यासंदर्भात भेदभाव करत असून कडेपठार मंदिरातील विश्वस्त मंडळ व खंडोबा मंदिरातील विश्वस्त मंडळ ग्रामस्थांच्या पारंपारिक रूढी व परंपरा याबाबत सहकार्य करत नसल्याचा आरोप यावेळी बैठकीत ग्रामस्थांनी केला.

थोडक्यात पण महत्वाचे



पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये कंटेनर अडकला; चालक फरार!

पिंपरी : दैनिक संध्या

चिंचवडहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये शनिवारी (दि.१७ ऑक्टोबर) पहाटे एक कंटेनर अडकल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. विशेष म्हणजे, कंटेनर अडकल्यानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. कंटेनरच्या धडकेमुळे पुलाच्या स्लॅबचेही मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत असून, कंटेनर बाहेर काढण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये अवजड आणि निर्धारित उंचीपेक्षा अधिक उंचीची वाहने अडकण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असताना, पुन्हा एकदा कंटेनर अडकल्याने वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेचा फटका पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांना बसत असून, नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. ग्रेड सेपरेटरमध्ये प्रवेश करण्यापूर्वी वाहनांच्या उंचीची मर्यादा स्पष्ट करणारे फलक, आवश्यक उंची प्रतिबंधक व्यवस्था आणि प्रभावी देखरेख असणे अपेक्षित आहे. असे असतानाही अवजड कंटेनर ग्रेड सेपरेटरमध्ये प्रवेश करून अडकत असल्याने या व्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कंटेनर अडकल्यामुळे पुलाच्या स्लॅबचे नुकसान होणे ही केवळ वाहतूक कोंडीची बाब नसून, पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी नुकसानीची पाहणी करून पुलाच्या संरचनेची सुरक्षितता तपासणे आवश्यक आहे. अशा घटना घडू नयेत यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी समन्वयाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. ग्रेड सेपरेटरच्या प्रवेशद्वारावर उंची मर्यादेचे ठळक फलक, उंची प्रतिबंधक यंत्रणा आणि अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी व्यवस्था उभारण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. कंटेनर अडकल्यानंतर वाहतूक कोंडी, पुलाच्या संरचनेचे नुकसान आणि नागरिकांची गैरसोय अशा समस्या निर्माण होत असतील, तर भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. संबंधित प्रशासन या घटनेची दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करणार का, असा सवाल वाहनचालक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अखेर वायसीएम रुग्णालयातील मद्यधुंद वैद्यकीय अधिकाऱ्याचे निलंबन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील कर्तव्यावर असताना मद्यप्राशन केल्याचा गंभीर प्रकार समोर आलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव अविनाश म्हस्के यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी १६ ऑक्टोबर रोजी निलंबनाचे आदेश जारी केले असून, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीचेही निर्देश दिले आहेत. १५ ऑक्टोबर रोजी रुग्णालयात अत्यावश्यक सेवा बजावत असताना डॉ. म्हस्के हे मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत आढळल्याचे निष्पन्न झाले. या गंभीर प्रकाराची दखल घेत रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे अहवाल सादर केला होता. रुग्णांच्या आरोग्याशी आणि जीविताशी संबंधित अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत असताना अशा प्रकारचे वर्तन करणे हे गंभीर गैरवर्तन मानले जात आहे. शासकीय आचारसंहिता तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे उल्लंघन झाल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने तातडीने कारवाई केली आहे. डॉ. म्हस्के यांच्याविरुद्ध १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करून विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निलंबनाच्या कालावधीत डॉ. म्हस्के यांना पिंपरी येथील महापालिका मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, या काळात अन्य कोणताही व्यवसाय किंवा नोकरी करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. वायसीएमसारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक रुग्णालयात कर्तव्यावर असताना घडलेल्या या प्रकारामुळे वैद्यकीय सेवांमधील शिस्त आणि जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणातील विभागीय चौकशीतून पुढे काय निष्पन्न होते आणि संबंधित अधिकाऱ्यावर कोणती अंतिम कारवाई होते, याकडे आता लक्ष लागले आहे.

पाणीटंचाईच्या काळात महापालिकेचे टँकर बीआरटीचे दुभाजक धुण्यासाठी!

पिंपरी : दैनिक संध्या

राज्यात दुष्काळाचे भीषण संकट असल्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात पाणीकपात



सुरू आहे. असे असताना महापालिकेच्या टँकरने बीआरटी मार्गातील बॅरिकेट्स धुण्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. महापालिका प्रशासनाकडून पाणी वाया घालवण्याच्या प्रकारावरून संताप व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात दुष्काळ पडला आहे. भविष्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेने शहरात पाणीकपात सुरू केली आहे. अशा परिस्थितीत महापालिकेचा एक असंवेदनशील प्रकार समोर आला आहे. काळेवाडी परिसरात भर उन्हात महापालिकेने पाण्याचे टँकर आणून बीआरटीएसचे दुभाजक धुण्याचा प्रकार समोर आला आहे. एका बाजूला नागरिक पाण्याच्या तक्रारी करत असताना, दुसरीकडे टँकरने पाणी आणून ते अशा प्रकारे वाया घालवले जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दुभाजक धुण्याचे प्रकाराचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पाणी काटकसरीने वापरा, असे उपदेश देणाऱ्या महापालिका प्रशासनाची या प्रकारावरून रोष व आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरातील रस्त्यावरील बीआरटीएसचे रेलिंग व दुभाजकांची स्वच्छता करण्यासाठी महापालिकेच्या मैलाशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्यात येत आहे. ते काम महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या टँकरमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी उपलब्ध असलेल्या शुद्ध पाण्याचा वापर यासाठी केला जात नाही. पावसाळ्यामुळे रस्त्यावरील चिखल, माती व धूळ बीआरटी रेलिंग व दुभाजकांवर साचलेली आहे. या थरामुळे रेलिंगचा रंग, दुभाजकांच्या कडा व त्यावरील परावर्तक पट्टे झाकले जाऊन ते वाहनचालकांना स्पष्टपणे दिसण्यात अडथळा निर्माण झालेला आहे. त्यामुळे ही स्वच्छता केवळ सौंदर्यीकरणाचा भाग नसून, रस्ते सुरक्षिततेशी संबंधित देखभाल दुरुस्तीचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणून करण्यात येत आहे.



आंद्रा धरणग्रस्तांचा २६ वर्षांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मोर्चा

तळेगाव, पिंपरी-चिंचवडसह वडगाव मावळला पाणी नेण्याच्या नियोजनाला विरोध

■ वडगाव मावळ : (दै. संध्या)

मावळ तालुक्यातील आंद्रा धरणग्रस्तांच्या गेल्या २६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी (दि. २२) तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला. आंद्रा धरणातून तळेगाव, पिंपरी-चिंचवडसह वडगाव मावळला पाणीपुरवठा करण्याच्या नियोजनाला तसेच ठोकळवाडी धरणातूनही पाणी नेण्याच्या प्रस्तावित हालचालींना धरणग्रस्तांनी विरोध दर्शविला आहे. सुरू असलेले बंदिस्त पाइपलाइनचे काम तातडीने थांबवावे, अशी ठाम मागणी धरणग्रस्तांनी केली आहे.

टाकवे बुद्रुक येथील भैरवनाथ मंदिरात आंद्रा धरणग्रस्त व परिसरातील शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत गेल्या २६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. शासनाकडून धरणग्रस्तांच्या मागण्यांवर ठोस निर्णय होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. बाधित शेतकरी आणि कुटुंबांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार या वेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस आंदर मावळ परिसरातील शेतकरी आणि धरणग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी मोर्चाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील धरणग्रस्तांमध्ये एकजूट निर्माण करण्यावर भर देण्यात आला असून या बैठकीत २२ तारखेला होणाऱ्या मोर्चात आंदर मावळातील प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी उपस्थितीत राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. बंदिस्त पाइपलाइनचे काम तातडीने थांबवले नाही, तर शेतकरी आणि धरणग्रस्त स्वतः कामाच्या ठिकाणी जाऊन ते थांबवतील, असा इशारा बैठकीत देण्यात आला. या प्रश्नावरून परिसरात तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासन आणि प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करावा, अशी मागणीही करण्यात आली. धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांवर निर्णय झाल्याशिवाय पाणी बाहेर नेण्याच्या योजनांना सहकार्य करणार नसल्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. बंदिस्त पाइपलाइनद्वारे सुरू असलेले काम तातडीने थांबवावे आणि शासनाने धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कार्यवाही करावी आणि धरणग्रस्तांच्या मागण्यांची सोडवणूक करावी, अशी भूमिका उपस्थितांनी मांडली. आंद्रा धरणातून तळेगाव आणि पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करण्याबरोबरच वडगाव मावळलाही पाणी नेण्याचे नियोजन असल्याचे धरणग्रस्तांचे म्हणणे आहे. तसेच ठोकळवाडी धरणातील पाणीही बाहेर नेण्याच्या नियोजनाबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. स्थानिक भागातील शेतकरी आणि धरणग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित असताना बाहेरील शहरांसाठी पाणी नेण्याच्या योजनांना प्राधान्य का दिले जात आहे, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

१० टक्के कपात करण्याच्या आयुक्तांच्या सूचना

■ पिंपरी (दै. संध्या)

अपुऱ्या पर्जन्यमानामुळे आणि आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि काटकसरीने करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून, पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी प्रभाग स्तरावर विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा तसेच पुढील वर्षी राज्यात पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता



आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठा करता यावा, यासाठी सर्व महानगरपालिका आणि इतर संबंधित संस्थांनी पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार पाण्याचे नियोजन आणि काटकसरीच्या वापरासाठी महापालिकेने कार्यवाही सुरू केली आहे. गृहनिर्माण सोसायट्यांनी उद्याने, हिरवळी आणि झाडांना पिण्याच्या पाण्याऐवजी एसटीपी तसेच जीटीपीच्या प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करावा.

वृक्षतोडीप्रकरणी २२ ऑक्टोबरला 'वृक्ष अंत्ययात्रा' आंदोलन!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्यालयाशेजारील बांधकाम प्रकल्पासाठी ५२ पेक्षा अधिक जुन्या वृक्षांची तोड करताना कागदपत्रांमध्ये वृक्षांची संख्या आणि वय कमी दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीने (आप) केला आहे. या प्रकरणातील कथित गैरव्यवहाराचा आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाचा निषेध करण्यासाठी आप पिंपरी-चिंचवड आणि महाराष्ट्र राज्य युवक आघाडीच्या वतीने गुरुवार, २२ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता 'वृक्ष अंत्ययात्रा' आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी दिली.

महापालिकेजवळील संबंधित बांधकाम प्रकल्पासाठी सुखवानी असोसिएट्स या बांधकाम व्यावसायिकाला आर्थिक फायदा पोहोचवण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाचा मूळ अहवाल बदलण्यात आल्याचा आरोप आपकडून करण्यात आला आहे. उद्यान अधीक्षक महेश गारगोटे आणि राजेश वसावे या अधिकाऱ्यांनी अहवालात फेरफार करून वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्ष आणि जनतेची दिशाभूल केल्याचा दावा पक्षाने केला आहे. या कथित प्रकारामुळे बिल्डरला दीड कोटी रुपयांहून अधिक रुपयांचा फायदा झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित बांधकाम व्यावसायिकासह कथितरीत्या अहवालात बदल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आप युवक आघाडीने केली आहे. दिशाभूल करून मिळवलेली बांधकाम परवानगी रद्द करावी.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी राज्य सरकारकडून मदत

■ पिंपरी-चिंचवड(दै. संध्या)

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसाहाय्य देण्यासह कर्जवसुलीला लगाम घालणे, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांबद्दल भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचे अभिनंदन केले आहे. या निर्णयांमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रावर गेल्या अनेक दशकांत न अनुभवलेल्या भीषण दुष्काळाचे सावट असल्याचे नमूद करत काटे म्हणाले की, राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले आहेत. या परिस्थितीत पाणी, पीक आणि चारा नियोजनासोबतच शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जमा करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित यंत्रणांना दिल्याचे काटे यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णयही स्वागतार्ह असल्याचे ते म्हणाले.

थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करा

■ पिंपरी (दै. संध्या)

मालमत्ताकराची थकबाकी, मालमत्ता जप्तीची कारवाई, मालमत्ता हस्तांतरणाची प्रकरणे, सारथी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी तसेच, मागील बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी घेतला. मालमत्ता जप्तीची कठोर कारवाई करून वसुलीचे टार्गेट पूर्ण करण्याच्या त्यांनी करसंकलन विभागास सक्त सूचना दिल्या आहेत.

या बैठकीत उपायुक्त सचिन पवार, प्रशासन अधिकारी रश्मी देशपांडे, सहायक मंडल अधिकारी बाळू लोंढे, हनुमंत सरवदे, मनोज शिंदे, अजित नखाते, रणजित भोसले, जयंत मरळीकर, राजेश बांदल, रवींद्र शिंदे, राजेंद्र कुदळे, प्रसाद एच. एस, राकेश सौदे, अतुल काळे, नाना सोनटके, निता राणे, डी. डी.



गोरडे, हनुमंत मोरे, मिलिंद कांबळे आदी उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या, की चालू आर्थिक वर्षासाठी निश्चित करण्यात मालमत्ताकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध आणि प्रभावीपणे काम करावे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात मालमत्ताकराच्या उत्पन्नाचा मोठा वाटा असतो.

या उत्पन्नाच्या आधारे विविध विकासकामे व नागरी सुविधांसाठी आर्थिक नियोजन करण्यात येते. त्यामुळे मालमत्ताकर वसुलीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व सहायक मंडल अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात नियोजनबद्ध करवसुली मोहीम राबवून निश्चित केलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे. करवसुलीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मालमत्ताकर वसुली वाढविण्यासाठी प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीचा अभ्यास करून प्रभावी उपाययोजनांचे नियोजन करावे. करवसुलीची आकडेवारी वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत, याबाबतची लेखी माहिती सादर करावी. मागील पाच वर्षांतील मालमत्ता कर संकलनाच्या आकडेवारीची तुलना करून चालू वर्षातील करवसुलीचा आढावा घेण्यात येणार आहे.

लोणावळ्यात फुगे विक्रेत्यांचा चाकूहल्ला; थरारक घटना सीसीटीव्हीत कैद

■ लोणावळा(दै. संध्या)

लोणावळा शहरामध्ये मुख्य चौक व मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर फुगे विकणाऱ्या दोन जणांनी एकमेकांवर चाकू हल्ला केल्याची घटना एका दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. ही घटना रात्रीच्या सुमारास घडलेली आहे.

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या लगत एका बंद दुकानाच्या समोरील मोकळ्या जागेमध्ये काही फुगेवाले नागरिक व इतर नागरिक झोपले होते. या वेळी त्या ठिकाणी आलेल्या एका व्यक्तीने दुसऱ्या झोपलेल्या व्यक्तीवर अचानकपणे हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यानंतर झोपेतून उठलेल्या त्या व्यक्तीनेदेखील हल्ला करणाऱ्या व्यक्तीवर प्रतिहल्ला केला. या दोन्ही व्यक्तींच्या हातामध्ये चाकूसारख्या धारदार वस्तू होत्या व त्याने ते एकमेकांना मारत होते. दोघांचेही हल्ल्यानंतर त्या ठिकाणी रक्तस्राव झाला. त्यामुळे आजूबाजूला झोपलेल्या इतर नागरिकांनी त्यांना तिथून हाकलून देण्याचा प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालेला आहे.

लोणावळा शहर हे पर्यटनस्थळ आहे. या ठिकाणी वेगवेगळ्या भागांतून मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. रात्रीच्या वेळीदेखील पर्यटकांची वर्दळ शहरामध्ये सुरू असते. तसेच पहाटेदेखील अनेक पर्यटक शहरामध्ये दाखल होत असतात. नशा करून रात्री अपरात्री वेगवेगळ्या भागांमध्ये फिरणाऱ्या या नागरिकांकडून पर्यटक असो वा स्थानिक नागरिक यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. मागील काळामध्ये नगरपरिषद व तत्कालीन लोकप्रतिनिधी तसेच पोलिस अधिकारी यांनी या फुगे विक्रेत्यांवर कारवाई करत त्यांना लोणावळा शहरातून हद्दपार केले होते. मात्र, काही दिवस शहराबाहेर गेल्यानंतर पुन्हा यांचा तांडा एक एक करत लोणावळा शहरामध्ये दाखल झाला आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



नगदवाडी केंद्रशाळेच्या विद्यार्थ्यांची शिवकृपा हायटेक नर्सरीला क्षेत्रीय भेट

नारायणगाव : दैनिक संध्या

नगदवाडी-जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा नगदवाडी,ता.जुन्नर,जि.पुणे येथील विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षण उपक्रमांतर्गत शिवकृपा हायटेक नर्सरीला क्षेत्रीय भेट दिली.विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभवातून व्यावसायिक कौशल्यांची ओळख व्हावी. हा या भेटीमागील प्रमुख उद्देश असल्याची माहिती नगदवाडी केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी नर्सरीतील विविध रोपे, त्यांचे संगोपन, रोपांची निर्मिती, आधुनिक नर्सरी व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन यांविषयी प्रत्यक्ष भेट देऊन माहिती जाणून घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नर्सरी व्यवसायाची ओळख होऊन श्रमप्रतिष्ठा,स्वावलंबन, उद्योजकता आणि निसर्गप्रेम यांचे महत्त्व समजण्यास मदत झाली. "प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण,कौशल्यातून स्वावलंबन" या संकल्पनेला बळ देणारी ही क्षेत्रीय भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.शालेय शिक्षणाची सांगड व्यावहारिक ज्ञानाशी घालणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. या क्षेत्रीय भेटीचे नियोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,विद्या वाघ,पंडित चौगुले,निलेश शेलार,आशा आरेकर,उज्वला कांबळे व स्मिता काळे यांनी केले. जुन्नर तालुका गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे,शिक्षण विस्तार अधिकारी अशोक गोडसे, नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे, नगदवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे, सर्व सदस्य व ग्रामस्थ यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी शिवकृपा हायटेक नर्सरीचे मालक राजू जगताप,साहिल जगताप, व्यवस्थापक राजू डुब्बल यांचे विशेष सहकार्य केल्याबद्दल पदवीधर शिक्षक मंगेश मेहेर यांनी आभार मानले.

जेजुरीत म्हाळसादेवी मंडळाचे विविध उपक्रम

जेजुरी : दैनिक संध्या



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत म्हाळसादेवी नवरात्र उत्सव मंडळ विद्यानगर च्या वतीने सलग तेराव्या वर्षी विविध उपक्रमात नवरात्र सुरू आहेत. जेजुरी येथे म्हाळसादेवी मंडळाच्या वतीने सलग तेरा वर्षे धार्मिक उपक्रमाबरोबरच जेजुरी जत्रा, नवजात मुलींचे स्वागत, सांस्कृतिक स्पर्धा, महिलांसाठी खेळ पैठणीचा, दांडिया आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी उत्साहात विविध धार्मिक सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत. मंडळाचे दिनेश डोईफोडे, कुंडलिक लाखे,चांगदेव थीकोळे,सचिन सातभाई, महेश चव्हाण ,आदींनी या उपक्रमाचे आयोजन केले आहे.



नारायणगाव, वारूळवाडीत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी

नारायणगाव : दैनिक संध्या

गावातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि घनकचरा व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने नारायणगाव व वारूळवाडी ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रस्तावित प्रकल्पांच्या ठिकाणांची १५ ऑक्टोबर रोजी संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केली. ग्रामपंचायत स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने ही पाहणी करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद पुणे येथील शाखा अभियंता श्री.सुरज डुबल, जिल्हा परिषद पुणे,SBM जिल्हा समन्वयक श्री.विकास कडवे व श्री.विक्रम शिंदे, तसेच पंचायत समिती जुन्नरचे SBM तालुका समन्वयक श्री .तडवी उपस्थित होते. या पाहणीदरम्यान प्रकल्पासाठी उपलब्ध जागेची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक बाबींची माहिती घेण्यात आली. दरम्यान, जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा, आनंदवाडी येथे भेट देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व पटवून देत हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात आले. वैयक्तिक स्वच्छता राखल्याने आजारांचा धोका कमी होण्यास मदत होते, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.या उपक्रमावेळी नारायणगाव ग्रामपंचायतीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

अखेर जनतेच्या प्रयत्नांना यश! नारायणगाव-वाशी एसटी बससेवा पुन्हा सुरू होणार

नारायणगाव : दैनिक संध्या

वाशी एसटी बससेवा बंद असल्याने गेल्या दीड ते दोन वर्षांपासून नारायणगाव, सावरगाव, येणेरे यांसह परिसरातील २० ते २५ गावांतील नागरिकांना प्रवासासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर नागरिकांच्या मागणीला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, दसऱ्याच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ पासून ही बससेवा जुन्या मार्गाने आणि नियमित वेळेत पुन्हा सुरू होणार आहे. रस्त्याच्या कामाचे कारण देत ही बससेवा बंद करण्यात आली होती. मात्र, रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतरही बससेवा सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. विशेषतः नवी मुंबईतील वाशी येथील एपीएमसी मार्केटमध्ये काम करणारे हमाल, कामगार, फळभाजी विक्रेते, छोटे व्यापारी आणि नोकरीसाठी मुंबई परिसरात जाणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत होता. गावाकडे येण्यासाठी किंवा पुन्हा कामावर जाण्यासाठी प्रवाशांना कल्याणमार्गे प्रवास करावा लागत होता. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त खर्च होत होता. तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना वारंवार बस बदलून प्रवास करणे त्रासदायक ठरत होते. नारायणगाव-वाशी बससेवा ही परिसरातील नागरिकांसाठी मुंबईशी जोडणारी महत्त्वाची वाहतूक सुविधा असल्याने ती पुन्हा सुरू करण्याची मागणी सातत्याने केली जात होती.

अभिव्यक्ती म्हणजे समाज परिवर्तनाचे सशक्त माध्यम: कृषिरत्न अनिल मेहेर

■ नारायणगाव (दै. संध्या)



सध्याचे जग हे ज्याप्रमाणे यंत्राचे आहे तसेच ते तरुणांचे आहे आणि या तरुणांच्या हातात भविष्य घडविण्याची क्षमता आहे. असे प्रतिपादन ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर यांनी केले. नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'गुरुवर्य रा.प.सबनीस राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्त्व स्पर्धे'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, अभिव्यक्ती हे माणसाच्या जगण्याचा सार आहे. आजची तरुण पिढी ही अधिक गंभीर व अधिक जबाबदार असल्याचे दिसते म्हणून त्यांनी या देशाचे भवितव्य घडवण्यात मोलाचा सहभाग घ्यावा.

त्यासाठी त्यांनी आपल्यावर होणारे सामाजिक संस्कार, शिक्षण आणि ग्रामीण विकास याकडे लक्ष द्यावे. तसेच गुरुवर्य रा.प. सबनीस यांच्या कार्याचा आढावा घेऊन या पुढील काळात विद्यार्थ्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र याचा अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयाद्वारे आयोजित या स्पर्धेस लातूर, परभणी, औरंगाबाद, नाशिक, मुंबई अशा महाराष्ट्रातील विविध विभागातील 62 विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय व सर्वांचे स्वागत स्पर्धेचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल गोंगे यांनी केले. आभार डॉ.अनिल काळे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी केले.

'गुरुवर्य रा.प.सबनीस राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्त्व स्पर्धे'च्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सायंकाळी ५.०० वाजता संपन्न झाला. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचरचे प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड हे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. नानासाहेब गायकवाड यांनी गुरुवर्य रा.प.सबनीस यांच्या सेवाभावी, निःस्वार्थ कामाचे महत्त्व सांगितले. तरुणांनी गुरुवर्य रा.प.सबनीस यांच्या विचारांचा अंगीकार करावा असे त्यांनी प्रतिपादन केले.

या स्पर्धेच्या समारोप प्रसंगी ग्रामोन्नती मंडळाचे कार्यवाह रविंद्र पारगावकर हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अनुभवपर भाषणामध्ये विद्यार्थ्यांना श्रम, संस्कार आणि सभ्यता याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षपदी ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजितभाऊ खैरे हे उपस्थित होते. या स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी परीक्षक म्हणून श्री. आकाश डावखरे, डॉ.राजकुमार कदम, श्री. रतीलाल बाबेल व प्रा.अश्विनी गायकवाड यांनी पार पडली.

या स्पर्धेत पारितोषिके मिळवणारे विद्यार्थी - वादविवाद स्पर्धेचे विजेते प्रथम क्रमांक- मोहिते आकाश दत्तात्रेय (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पारनेर), द्वितीय क्रमांक -आहेर हनुमानराव सुभाषराव (श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी), वनारे अनिकेत रामा (आप्पासाहेब जेधे महाविद्यालय,पुणे) याने तृतीय क्रमांक मिळविला तर चतुर्थ क्रमांक अळशी अभय कृष्णाकांत (मुंबई विद्यापीठ, मुंबई) याने प्राप्त केला. तर या स्पर्धेचे सांघिक बक्षीस व फिरता करंडक मिळविण्याचा मान पुण्याच्या आप्पासाहेब जेधे महाविद्यालयास मिळाला. या महाविद्यालयातील रमेश सुनील कचरे व अनिकेत रामा वनारे यांनी हे सांघिक बक्षीस मिळवले.

तसेच वक्तृत्त्व स्पर्धेची पारितोषिके मिळवणारे स्पर्धक - प्रथम क्रमांक - अहिनवे श्रद्धा सुरेश (अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर) द्वितीय क्रमांक- देशमुख श्रुती काशिनाथ (दयानंद महाविद्यालय, लातूर), धावले भक्ती पंढरीनाथ (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) ,मोरे तनया बालाजी (सी.ओ.ई.पी. तंत्रनिकेतन महाविद्यालय, पुणे) यांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावला. तर माणिकचंद पहाडे महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयाने वक्तृत्व स्पर्धेचे सांघिक विजेतेपद व फिरता करंडक पटकावण्याचा बहुमान मिळवला.या महाविद्यालयातील दराडे आदित्य ज्ञानेश्वर व गिरी प्रथमेश बळीराम यांच्या संघाने हे पारितोषिक पटकावले.

या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून देण्याची जबाबदारी डॉ. शिवाजी टाकळकर यांनी पार पडली तर मान्यवरांचे आभार डॉ.रसूल जमादार यांनी मानले. तर सूत्रसंचालन डॉ.विनायक कुटे यांनी केले. या स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्यासाठी या स्पर्धेचे स्पर्धा समन्वयक डॉ. मिलिंद कसबे, डॉ. सचिन रूपनर, डॉ.शरद काफले यांनी विशेष प्रयत्न केले.

आंबेगाव तालुक्यात जाधववाडीत नर बिबट्या जेरबंद; गार ओढा, सुंदरमळा परिसरात भीती कायम

वन विभागाने उसाच्या शेताशेजारी लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला; परिसरात आणखी बिबट्यांचा वावर असल्याने शेतकरी धास्तावले

■ पारगाव (दै. संध्या)



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील जाधववाडी येथे वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात नर बिबट्या जेरबंद झाला. गुरुवारी (दि. १५) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मात्र, जाधववाडीतील गार ओढा आणि सुंदरमळा परिसरात अद्यापही बिबट्यांचा वावर असल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

जाधववाडी ते थोरांदळे रस्त्यावरील गार ओढा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर वाढला होता. शेतकऱ्यांना वारंवार बिबट्यांचे दर्शन होत असल्याने त्यांनी वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली होती. त्यानुसार, वनविभागाने पाच ते सहा दिवसांपूर्वी शेतकरी अंकुश गोविंद जाधव यांच्या घराजवळील उसाच्या शेताशेजारी पिंजरा लावला होता.

गुरुवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास या पिंजऱ्यात नर बिबट्या जेरबंद झाला. ही माहिती मिळताच अंकुश जाधव यांनी वनविभागाला कळवले. त्यानंतर वन परिमंडळ अधिकारी आर. एन. फुलमाळी, रेस्क्यू टीमचे प्रज्वल आवारी आणि वनसेवक महेश टेमगिरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले. पकडलेल्या बिबट्याचे वय अंदाजे दीड ते दोन वर्षे असल्याची माहिती वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दिली.

जाधववाडी परिसरात एक बिबट्या जेरबंद झाल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, गार ओढा आणि सुंदर मळा परिसरात अद्यापही बिबट्यांचा वावर असल्याचे सांगण्यात येत आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊसशेती असल्याने बिबट्यांना लपण्यासाठी अनुकूल जागा उपलब्ध होत आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि शेतात कामासाठी जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीती कायम आहे.



नारायणगाव येथे 'अशोक स्मार्ट स्टोअर'चे डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते उद्घाटन

■ नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथील उद्योजक श्री. संदीप सूर्यकांत गांधी यांच्या 'अशोक स्मार्ट स्टोअर' या नवीन व्यवसायाचे उद्घाटन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. या नवीन व्यवसायामुळे गांधी परिवाराने नारायणगावच्या व्यावसायिक क्षेत्रातील आपला विस्तार आणखी वाढविला आहे.

गांधी परिवार गेल्या अनेक वर्षांपासून अशोक बुक स्टॉल, अशोक स्टोअर्स आणि अशोक बुक एजन्सी अशा विविध व्यवसायांच्या माध्यमातून नारायणगावच्या उद्योग क्षेत्रात कार्यरत आहे. ग्राहकांना दर्जेदार वस्तू आणि उत्तम सेवा देण्याची परंपरा या परिवाराने जपली आहे.

नवीन व्यवसायाच्या शुभारंभप्रसंगी डॉ. अमोल कोल्हे यांनी संदीप गांधी व त्यांच्या परिवाराचे अभिनंदन केले. 'अशोक स्मार्ट स्टोअर'च्या माध्यमातूनही ग्राहकांना उत्तम दर्जा आणि चांगली सेवा मिळत राहो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. यावेळी आमदार श्री. शरददादा सोनवणे, श्री.अनिलतात्या मेहेर, श्री.विलास भळगट, श्री.प्रकाश पाटे, श्री. जितू गुंजाळ, श्रीमती. राजश्रीताई बोरकर, सौ.उज्वलाताई शेवाळे, श्री.सुखदेव बनकर, श्री.संतोष वाजगे, श्री.बाबूभाऊ पाटे, श्री. रामशेठ दळवी, श्री.गुलाब नेहरकर, श्री.डी. डी. डोके, श्री.अनंतराव चौगुले, श्री.तुषार थोरात, श्री.राजेंद्रभाऊ कोल्हे, श्री.रमेशभाऊ कोल्हे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

खडकवासला प्रकल्पातून यंदा उन्हाळी आवर्तन बंद; अडीच लाख हेक्टर शेतीला फटका

■ खडकवासला (दै. संध्या)



दुष्काळी परिस्थितीत खडकवासला प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे यंदा कालव्यातून उन्हाळी आवर्तन देण्यात येणार नसल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे उन्हाळी आवर्तनातून सिंचन होणाऱ्या अडीच लाख हेक्टर शेतीला फटका बसणार आहे. धरणातील उपलब्ध पाणीसाठा कमी असल्यानेच हा निर्णय घेण्यात आला आहे.


खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांमधील पाणी पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासह पुरंदर, दौंड, बारामती, इंदापूर आणि हवेली या तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या पाण्यासाठी वापरले जाते. चारही धरणांमध्ये एकूण २९ टीएमसी पाणीसाठा निर्माण होतो. यंदा पावसाळ्यात चारही धरणे तुडुंब भरली. पावसाळ्यात पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिरिक्त पावसामुळे मुठा नदीतून सुमारे १९ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला. मात्र, त्याचदरम्यान हे अतिरिक्त पाणी कालव्यातूनही सोडण्यात आले. रब्बीचे आवर्तन सुरू होण्यापूर्वी सुमारे ६.३८ टीएमसी पाणी कालव्याद्वारे सोडण्यात आले होते. या चारही तालुक्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी असल्याने या कालव्यातून सोडलेल्या पाण्याचा फायदा खरिपातील पिकांना झाला. यंदा रब्बीचे आवर्तन दि. २५ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आले आहे. हे आवर्तन ४५ दिवस सुरू राहणार आहे. त्यामुळे दररोज सुमारे ११०० क्युसेकने हे पाणी सोडण्यात येत आहे. सुमारे चार टीएमसी पाणी पहिल्या आवर्तनातून देण्यात येणार आहे.

दरम्यान, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी वापरण्याचे स्पष्ट निर्देश राज्य सरकारकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यंदा उन्हाळी आवर्तन बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षी अर्थात २०२५ मध्ये या तालुक्यांसाठी खरिपाचे पंधरा दिवस आवर्तन सुरू होते. त्यात सुमारे ४०० दशलक्ष घनफूट पाणी सोडण्यात आले. दिवाळीपर्यंत पाऊस सुरू असल्याने रब्बीचेही आवर्तन नऊ डिसेंबर ते दहा फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू होते. या ६४ दिवसांत सुमारे ३.७७ टीएमसी पाणी सोडण्यात आले. त्यानंतर पहिले उन्हाळी आवर्तन दि. १७ फेब्रुवारी ते ११ मेपर्यंत ८४ दिवस सोडण्यात आले.

याचदरम्यान हडपसरजवळ कालवा फुटल्याने नऊ दिवस आवर्तन बंद करण्यात आले होते. या कालावधीत ६.९७ टीएमसी पाणी सोडण्यात आले. यातून सुमारे अडीच लाख हेक्टरला सिंचन करण्यात आले होते. या तालुक्यांसाठी दुसरे उन्हाळी आवर्तन दि. १२ मे ते १३ जूनपर्यंत असे ३३ दिवसांसाठी सोडण्यात आले. या कालावधीत ३.४० टीएमसी पाणी सोडले. त्यामुळे एकूण दोन उन्हाळी आवर्तनासाठी १०.३५ टीएमसी पाणी वापर झाला. दुष्काळी परिस्तिथीमुळे आता हे आवर्तन सोडण्यात येणार नसल्याने शेतीला फटका बसणार आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी औषधनिर्मिती कंपन्यांनी संशोधनावर भर द्यावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई(दै. संध्या)

औषधनिर्मिती क्षेत्रात संशोधन व नवोन्मेषाला चालना देऊन आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, किफायतशीर आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. जागतिक दर्जाची विद्यापीठे, संशोधन संस्था आणि औषधनिर्मिती कंपन्यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास या क्षेत्रात मोठी प्रगती साधता येईल. त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून आवश्यक धोरणात्मक व अन्य सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ॲस्ट्राझेनेका फार्मा इंडिया लिमिटेडच्या गोरेगाव येथील मुंबईतील जागतिक दर्जाच्या मुख्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कंपनीचे भारतातील अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रवीण राव अक्किनेपल्ली, एशियाचे उपाध्यक्ष अरुण कृष्णा, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारताने जागतिक औषधनिर्मिती क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले असून, अमेरिका आणि युरोपसारख्या कडक नियमन असलेल्या बाजारपेठांमध्येही भारतीय जेनेरिक औषधांची मोठी मागणी आहे. भारतीय औषधनिर्मिती उद्योगाची जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि क्षमता यामुळे सिद्ध झाली आहे. आता या



क्षेत्रात संशोधन आणि नवोन्मेष वाढविण्याची गरज आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून देशात उभारण्यात येणारा बल्क ड्रग पार्क महत्त्वाचा ठरणार असून, त्यातून औषधनिर्मिती क्षेत्रात व्यापक बदल घडतील, असे त्यांनी नमूद केले.

ॲस्ट्राझेनेकाने कोविड-१९ महामारीच्या काळात केलेले योगदान भारत कधीही विसरणार नाही. कोविशिल्ड लसीमुळे देशातील नागरिकांना मोठा आधार मिळाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या 'लस मैत्री' उपक्रमांतर्गत भारताने ९९ देशांना कोविड प्रतिबंधक लसींचा पुरवठा केला. या माध्यमातून 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीची भावना जगासमोर प्रत्यक्षात आली. या कार्यात ॲस्ट्राझेनेकाचे योगदान महत्वपूर्ण होते, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आरोग्यसेवेतील बदलांसाठी नवोन्मेष महत्वाचा असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औषधनिर्मिती, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि निदान पद्धतींमध्ये नवनवीन संशोधन होत आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजारांवरील उपचार अधिक प्रभावी करून मृत्यूचे प्रमाण अत्यल्प करण्याच्या दिशेने प्रयत्न होणे आवश्यक आहे. अचूक निदान, रुग्णाच्या गरजेनुसार उपचार आणि आधुनिक औषधांच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा दर्जा उंचावता येईल. प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्यसेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी नवोन्मेष हाच महत्वाचा मार्ग आहे.

महाराष्ट्रात जागतिक दर्जाच्या विद्यापीठांचे आगमन होत असून, ॲस्ट्राझेनेकाने या विद्यापीठांसह तसेच राज्यातील नामांकित संशोधन संस्थांसोबत सहकार्य करावे. अशा सहकार्यामुळे संशोधनाला संस्थात्मक स्वरूप मिळेल आणि नवोन्मेष क्षेत्रात कार्यरत असलेल्या तरुणांच्या प्रतिभेचा उपयोग करता येईल.

मुंबईतील मुख्यालयाच्या माध्यमातून कंपनीने संशोधन, औषधनिर्मिती आणि आरोग्यसेवेच्या विविध क्षेत्रांत विस्तार करावा. उद्योगांची वाढ ही राज्याच्या विकासाशी जोडलेली असल्याने महाराष्ट्र शासन उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या विकासाला गती देण्यासाठी सदैव सहकार्य करेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ॲस्ट्राझेनेका फार्मा इंडिया लिमिटेडचे भारतातील अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रवीण राव अक्किनेपल्ली यांनी प्रास्ताविकात कंपनीच्या मुंबईतील मुख्यालयामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, भारताच्या 'विकसित भारत' या संकल्पनेशी आणि महाराष्ट्राच्या 'विकसित महाराष्ट्र' या दृष्टिकोनाशी कंपनीचे उद्दिष्ट सुसंगत असून भारताला नवोन्मेषाधारित अर्थव्यवस्था बनविण्यासाठी औषधनिर्मिती आणि जैवऔषध क्षेत्रात संशोधनाला चालना देणे आवश्यक आहे.

ॲस्ट्राझेनेका ही जागतिक औषधनिर्मिती कंपनी असून, विज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे. कर्करोगावरील उपचारांमध्ये परिवर्तन घडविण्यासोबतच श्वसनविकार, जैवऔषधे आणि दुर्मिळ आजारांच्या उपचारांमध्येही कंपनी संशोधन करीत आहे. विज्ञानाच्या माध्यमातून समाजासाठी उपयुक्त कार्य करण्याच्या भूमिकेतून कंपनी महाराष्ट्राच्या विकासात योगदान देईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे

दोडामार्ग येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नूतन इमारतीचे लोकार्पण

सिंधुदुर्ग : जिल्ह्यातील दोडामार्ग येथील राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ च्या नूतन इमारतीचे लोकार्पण आज राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले. या इमारतीमुळे परिसरातील पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आहेत. दोडामार्ग येथील या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नूतन इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या कामासाठी ७२ लाख ६८ हजार रुपये खर्च झाला आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून, २८ मे २०२६ रोजी तिचे हस्तांतरण करण्यात आले होते. या दवाखान्यामुळे दोडामार्ग तालुक्यातील पशुधनाच्या आरोग्यसेवांना बळकटी मिळण्यास मदत होणार आहे. या लोकार्पण सोहळ्यास जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, दोडामार्ग पंचायत समितीच्या सभापती पार्वती गवस, सावंतवाडीचे उपविभागीय अधिकारी वीरसिंग वसावे, पशुसंवर्धन उपयुक्त समीर बिलोलीकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता पूजा इंगवले यांच्यासह दोडामार्गचे तहसीलदार राहुल गुरव, सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या उपविभागीय अधिकारी सीमा गोवेकर उपस्थित होते.

वैद्यकीय तज्ज्ञांनी ५२ हजार तरूणांना दिले आरोग्याचे धडे

मुंबई : बदलती जीवनशैली, मोबाईलचा वाढता वापर, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण यामुळे तरुणांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज वाढली आहे. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळावे, यासाठी नवरात्रोत्सव काळात राज्यात 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद, जागर आरोग्याचा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत राज्यात आतापर्यंत ३९३ सत्रे झाली असून, ५२ हजार ३८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. तरुण वयातच आरोग्याची काळजी घेण्याच्या योग्य सवयी लागाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्व समजावे, तसेच आरोग्यविषयक प्रश्नांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे, यासाठी ही सत्रे आयोजित केली जात आहेत. या उपक्रमांतर्गत विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत आहेत. या सत्रांमध्ये वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांतील विद्यार्थी सहभागी होत आहेत.

राज्यातील सर्व शाळांमध्ये १८ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान विशेष स्वच्छता मोहीम

मुंबई : राज्यातील सर्व शाळांमध्ये १८ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'चला शाळेत जाऊ या... विशेष शालेय स्वच्छता मोहीम' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि स्थानिक समुदायाच्या सहभागातून शाळांची स्वच्छता, सुशोभीकरण व देखभाल करून शैक्षणिक वातावरण अधिक पोषक करण्यात येणार आहे. शाळा परिसर स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि आनंददायी ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जबाबदारी आणि शिस्तीची भावना रुजविणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. समग्र शिक्षा योजनेंतर्गत शाळांमध्ये आवश्यक मूलभूत सुविधा आणि अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांना या मोहिमेमुळे चालना मिळणार आहे. शालेय शिक्षण विभागाने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. ही मोहीम दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी : मंत्री दादाजी भुसे

■ मालेगाव(दै. संध्या)

मालेगाव शहरातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे शासनाच्या निकषांनुसार नियमानुकूल करण्याची प्रक्रिया गतिमान करावी. प्रलंबित प्रस्तावांची छाननी, जमिनींची मोजणी, मालकी हक्क पडताळणी आणि नियमानुकूलतेचे आदेश पारित झालेल्या प्रकरणांतील उतारे वितरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

मालेगाव येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, उपविभागीय अधिकारी नितीन सदगीर, महानगरपालिका उपायुक्त डॉ. सुनीता कुमावत, तहसीलदार विशाल सोनवणे, नगर भूमापन अधिकारी पंढरीनाथ चौधरी, वनपरिक्षेत्र अधिकारी गायत्री सोनवणे, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी शेखर तनपुरे, उपअभियंता सचिन माळवाळ यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री भुसे म्हणाले की, उपलब्ध अहवालानुसार, यापूर्वी २ हजार ७९८ अतिक्रमणधारकांची प्रकरणे नियमानुकूल करण्यात आली आहेत. तसेच ५०० चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रावरील ५०६ अतिक्रमणधारकांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली आहे. महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार म्हाळदे गावठाण, सोयगाव आणि द्याने गावठाण येथील ५४२ अतिक्रमणधारकांचे प्रस्ताव नव्याने सादर



करण्यात आले आहेत.

या प्रस्तावांमध्ये निवासी व व्यावसायिक अतिक्रमणधारकांच्या स्वतंत्र याद्या तयार करून जमिनींची मोजणी येत्या आठवडाभरात पूर्ण करावी. तसेच यापूर्वी नियमानुकूलतेचे आदेश पारित झालेल्या ७५५ अतिक्रमणधारकांना उतारे वितरित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. संबंधित जमिनींचे अभिलेख, मालकी हक्क, आवश्यक ना-हरकत दाखले आणि मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका, महसूल व भूमी अभिलेख विभागांनी समन्वयाने काम करावे. दरेगाव येथील संभाव्य वनक्षेत्रातील घरकुलांशी संबंधित समस्या महसूल विभाग, वन विभाग आणि महानगरपालिका यांनी परस्पर समन्वयातून सोडवाव्यात, असे निर्देशही मंत्री भुसे यांनी दिले.

तलाठी कार्यालयाचे पालकमंत्री राणे यांच्या हस्ते लोकार्पण

■ सिंधुदुर्ग(दै. संध्या)

दोडामार्ग तालुक्यातील मौजे सासोली येथे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १४.९८ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या नूतन तलाठी कार्यालयाचे लोकार्पण राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेंतर्गत या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली आरसीसी फ्रेम, लाल विटांच्या भिंती, अंतर्गत व बाह्य गिलावा, व्हिट्रिफाइड फरशी आणि रंगकाम अशा कामांचा समावेश असलेल्या या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. नव्या कार्यालयामुळे सासोली परिसरातील नागरिकांना महसुली कामकाजासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून, शासकीय सेवा अधिक सुलभतेने मिळण्यास मदत होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, दोडामार्ग पंचायत समितीच्या सभापती पार्वती गवस, सावंतवाडीचे उपविभागीय अधिकारी वीरसिंग वसावे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता पूजा इंगवले यांच्यासह



दोडामार्गचे तहसीलदार राहुल गुरव, सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या उपविभागीय अधिकारी सीमा गोवेकर उपस्थित होते. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतन तलाठी कार्यालयात महसूल विभागाच्या ई-प्रणालीविषयक सुविधांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी, यासाठी क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. पालकमंत्री नितेश राणे यांनी या क्यूआर कोडचे स्कॅनिंग करून संबंधित सुविधांची पाहणी केली आणि डिजिटल माध्यमातून महसूलविषयक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाची माहिती घेतली. ई-प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांना महसूलविषयक माहिती मिळविणे अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

दुष्काळ सदृश्य परिस्थिती : केंद्रीय समितीच्या दौऱ्यानंतर प्रशासन आणखी सक्रिय

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये व सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीत केंद्र व राज्य शासनाच्या सनियंत्रणात वेगवेगळ्या उपाययोजना सुरू आहेत. केंद्रीय पथकांच्या काही सूचनांना लक्षात घेऊन राज्य शासनाच्या नव्या सूचनेनुसार विभागीय स्तरावर महसूल प्रशासनाने संपूर्ण मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत दुष्काळ निवारणासाठी सूक्ष्म नियोजन; पाणी, चारा आणि ग्रामीण रोजगारावर भर देणे सुरू केले आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये महसूल प्रशासनाने उपाययोजनांच्या नियोजनाला गती दिली आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात दुष्काळी परिस्थितीचा दररोज आढावा घेण्यात येत असून, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पशुधनासाठी चारा, पीक नुकसानीची नोंद आणि ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

८ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने मराठवाड्यातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर दुष्काळाच्या परिणामांचे मूल्यांकन आणि आवश्यक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय स्तरावर अधिक समन्वयाने काम सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार दुष्काळ व्यवस्थापनाचे नियोजन केले जात आहे. जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांच्या यंत्रणांमार्फत पर्जन्यमानातील तूट, पिकांची स्थिती, भूजल पातळी, धरणांमधील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज आणि चाऱ्याची उपलब्धता यांचा आढावा घेतला जात आहे. तालुका व गावनिहाय परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य अडचणींचा अंदाज घेणे आणि त्यानुसार आवश्यक उपाययोजनांची पूर्वतयारी करणे, याला प्राधान्य देण्यात येत आहे.

केंद्रीय पथकाच्या दौऱ्यात पिकांची प्रत्यक्ष




स्थिती, पावसातील खंडामुळे झालेले नुकसान, जलस्रोतांची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील परिस्थितीची पाहणी करण्यात आली. या पाहणीतून उपलब्ध झालेली माहिती तसेच जिल्हा प्रशासनाकडील नोंदी यांच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.तशी ती गतिशील ही झाली आहे. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करणे, नुकसानीच्या नोंदी अचूक ठेवणे आणि पात्र शेतकऱ्यांना लागू निकषांनुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे, यावर प्रशासनाचा भर आहे. दुष्काळामध्ये सर्वात महत्त्वाचे ठरते ते पिण्याचे पाणी.घरगुती वापराचे पाणी जनावरांना लागणारे पाणी आणि पुढील उन्हाळ्यापर्यंतची नियोजन याकडे प्रशासन लक्ष ठेवून आहे.पुढील काळात पाण्याचे दुर्भिक्ष वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन हा प्रशासनाच्या प्राधान्याचा विषय आहे. ज्या गावांमध्ये भूजल पातळी खालावली आहे किंवा नियमित पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणच्या परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित करणे, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था यांसाठी स्थानिक गरजांनुसार नियोजन करण्यात येत आहे.लस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याच्या वापराचे नियोजन आवश्यक आहे. पाणीटंचाईची तीव्रता वाढण्यापूर्वी संभाव्य टंचाईग्रस्त गावांची ओळख पटविणे, उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेणे आणि गरज भासल्यास तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवला जात आहे. त्याचबरोबर पावसाचे पाणी अडविणे, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि जलसंधारणाच्या कामांनाही महत्त्व आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



शेतकऱ्यांना कमी पाण्यातील चारा पिकवण्यास प्रोत्साहन द्या

बीड : दैनिक संध्या

बीड जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी व विविध विभागांच्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.या बैठकीत पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा,पीक पंचनामे, पीकविमा,शेतकऱ्यांना आर्थिक मदत,पाणीसाठ्याचे नियोजन आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांच्या अडचणी सोडविणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे.सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर राहावे आणि आवश्यकतेनुसार इतर कामे बाजूला ठेवून दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे,असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी दिले. सध्याची परिस्थिती लक्षात घेता नवीन विकासकामे हाती घेण्यासोबतच सुरू असलेली कामे प्राधान्याने आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा. जिल्हाधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर आढावा बैठका घेऊन स्थानिक परिस्थितीनुसार दुष्काळ निवारणाचे नियोजन करावे,अशा सूचना त्यांनी दिल्या. दुष्काळाच्या काळात जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता हा महत्त्वाचा प्रश्न आहे. यासाठी कृषी विभागाने गावपातळीवर जाऊन शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांची माहिती द्यावी आणि अशा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला चारा शासनाकडून खरेदी करण्याबाबत नियोजन केल्यास शेतकऱ्यांना उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध होईल आणि जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्थाही करता येईल,असे त्यांनी सांगितले. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा योग्य ठिकाणी आणि गरजेनुसार होत असल्याची खात्री करावी. टँकरच्या फेऱ्या व पाणीवाटपावर GPS प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्यासह पाणीपुरवठ्यातील गैरप्रकार टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात,असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात उपलब्ध असलेला एकूण पाणीसाठा,आगामी काळातील पाण्याची संभाव्य गरज आणि उपलब्ध स्रोतांची स्थिती यांची अचूक माहिती संकलित करून त्यानुसार जिल्ह्याचे नियोजन करावे.पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी नागरिकांमध्येही जनजागृती करावी,असे त्यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पीक पंचनामे तातडीने पूर्ण करून त्यांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.पीकविमा प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राखून पात्र शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे लाभ वेळेत मिळतील,याची दक्षता घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले. दुष्काळामुळे रेशीमशेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही नुकसान सहन करावे लागत असल्याने रेशीमशेतीचा समावेश नुकसानभरपाईच्या निकषांमध्ये करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे.यासंदर्भातील मुद्दा आगामी मंत्रिमंडळ बैठकीत मांडणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी सांगितले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत व कर्जपुरवठा सुलभ होणे आवश्यक आहे.यासाठी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज देताना सिबिल गुणांकनाचा अडथळा निर्माण करू नये, याबाबत संबंधित बँकांना सूचना देण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



महाकालीच्या उग्र रूपाने पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये रंगली तांडव नृत्याची भव्य प्रस्तुती

पुणे : दैनिक संध्या

पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये महाकाली तांडव डान्स लाईव्ह शो हे प्रमुख आकर्षण ठरले. निर्माता अजिंक्य साळुंखे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या नृत्याविष्कारात प्रमुख आकर्षण म्हणून सोनाली पुणेकर यांनी दमदार प्रस्तुती केली. महाकालीच्या उग्र आणि शक्तिशाली रूपाचे दर्शन घडविणाऱ्या या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या विशेष नृत्यप्रस्तुतीमध्ये कलाकारांनी महाकालीची प्रभावी वेशभूषा धारण केली होती. कलाकारांचा चेहरा, हात आणि पाय लाल रंगाने रंगविण्यात आले होते. डोक्यावर कवट्यांची नक्षी असलेला चमकदार चांदीचा मुकुट, गळ्यात मानवी कवट्या आणि हिरव्या पानांनी गुंफलेली लांब मुंडमाळ, अशी त्यांची वेशभूषा होती. काळ्या रंगाचा फुल-स्लीव्ह टॉप आणि पँट, कंबरेला चित्त्याच्या छापील नमुन्याचे वस्त्र तसेच हातात चांदीच्या आणि पांढऱ्या रंगाचा भव्य त्रिशूळ यामुळे महाकालीचे रौद्र रूप अधिक प्रभावीपणे साकारण्यात आले. मराठी आणि हिंदी गीतांच्या तालावर कलाकारांनी सादर केलेल्या नृत्यातून शक्ती, भक्ती आणि ऊर्जेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. आकर्षक वेशभूषा, प्रभावी देहबोली आणि जोशपूर्ण नृत्याविष्कारामुळे या कार्यक्रमाला विशेष रंगत आली. महाकालीच्या रूपातील कलाकारांची उपस्थिती आणि तांडव नृत्याची भव्यता हे या शोचे वैशिष्ट्य ठरले. या कार्यक्रमाची माहिती पुणे लोकमान्य फेस्टिवलचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली.

नागरिकांना जाहीर आवाहन

बारामती : दैनिक संध्या

शहर व परिसरातील सर्व नागरिक, व्यापारी, फटाके विक्रेते, सार्वजनिक उत्सव मंडळे, धार्मिक व सामाजिक संघटना, मिरवणूक आयोजक, डीजे चालक, ध्वनिक्षेपक व्यावसायिक आणि सर्व संबंधितांना बारामती शहर पोलीस स्टेशनच्या वतीने कळविण्यात येते की, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी व न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने In Re: Noise and Environmental Pollution विरुद्ध State of Maharashtra, स्वतःहून दाखल जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मध्ये दिनांक २२/०९/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाबाबत दिनांक १५/१०/२०२६ रोजी महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले आहे. सदर न्यायालयीन आदेश केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित नसून दिवाळी, दसरा, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच वर्षभर साजऱ्या होणाऱ्या सर्व धार्मिक सण-उत्सवांना संपूर्ण महाराष्ट्र राज्यात समानपणे लागू राहणार आहे. नागरिकांचे आरोग्य, सार्वजनिक सुरक्षितता, पर्यावरणाचे संरक्षण तसेच ध्वनी व वायुप्रदूषण रोखणे हा या आदेशाचा प्रमुख उद्देश आहे. १. सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास संपूर्ण बंदी : सार्वजनिक रस्ते, मुख्य चौक, गल्लीबोळ, पदपथ, वाहतुकीचे मार्ग आणि इतर सार्वजनिक ठिकाणी सण-उत्सवांच्या निमित्ताने फटाके फोडण्यास मा. उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे.

सणसर येथे माहिती अधिकार कार्यशाळा व गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न

■ वालचंदनगर (दै. संध्या)



इंदापूर तालुक्यातील सणसर येथील पालखी तळावर माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती, पुणे जिल्ह्याच्या वतीने गुरुवार,दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी माहिती अधिकार कार्यशाळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. माहिती अधिकार कायद्याविषयी जनजागृती करणे आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे,या दुहेरी उद्देशाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, पोलीस अधिकारी, लोकप्रतिनिधी,सामाजिक कार्यकर्ते,समितीचे पदाधिकारी आणि नागरिकांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाला यशोदा माहिती अधिकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष खंडूअण्णा गव्हाणे, वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश घोरपडे,बारामती परिवहन विभागाचे अधिकारी शेलार साहेब व चौधर साहेब,युवा उद्योजक तथा जिल्हा परिषद सदस्य सागर भिसे, सणसरचे सरपंच यशवंत पाटील, माजी सरपंच पार्थ निंबाळकर शिवसेनेच्या जिल्हा महिला प्रमुख विद्याताई गायकवाड पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण आणि पोलीस कर्मचारी गणेश काटकर, बिराजदार साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे पुणे जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी केले.त्यांनी समितीच्या कार्याची माहिती देताना माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व आणि ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत या कायद्याची माहिती पोहोचविण्याची गरज अधोरेखित केली. प्रशासनाकडून उपलब्ध असलेली माहिती मिळविणे आणि नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे, यासाठी माहिती अधिकार कायदा महत्त्वाची भूमिका बजावतो. नागरिकांनी कायद्याची योग्य माहिती घेऊन त्याचा नियमांनुसार वापर करावा, तसेच लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी जागरूक राहावे,असे या कार्यशाळेच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना माहिती अधिकार कायद्याची प्रक्रिया समजावी, शासकीय कामकाजाविषयी माहिती मिळविण्याचे मार्ग कळावेत आणि नागरिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी,या दृष्टीने अशा कार्यशाळा उपयुक्त ठरत आहेत. कार्यक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा विशेष आकर्षण ठरला.शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि गुणवत्तेचे कौतुक करण्यात आले.विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा मिळावी,त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि इतर विद्यार्थ्यांनीही शिक्षणात उत्तम कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित व्हावे,हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या यशाची समाजाने दखल घेणे आणि त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अशा सन्मान सोहळ्यांमुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळते आणि शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. या कार्यक्रमाच्या आयोजनात समितीच्या विविध पदाधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. यामध्ये पुणे जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय, जिल्हा उपाध्यक्ष प्रविण पिसे, इंदापूर तालुकाध्यक्ष राहुल पाटील,इंदापूर तालुका उपाध्यक्ष अमोल शिंगाडे, इंदापूर तालुका सरचिटणीस स्वप्निल शिंदे, पुणे जिल्हा महिला उपाध्यक्षा सुवर्णा दोरगे, इंदापूर तालुका उपाध्यक्ष ऋतुराज मारकड,इंदापूर तालुका संपर्कप्रमुख आकाश गवळी,बारामती तालुका महिला अध्यक्षा सुनीता डोंबाळे,बारामती तालुका महिला उपाध्यक्षा लक्ष्मीप्रभा करे,इंदापूर तालुका सचिव दीपक मकर आणि इंदापूर तालुका संघटक संजय शिंदे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पवार यांनी केले, तर इंदापूर तालुकाध्यक्ष राहुल पाटील यांनी उपस्थित मान्यवर,पदाधिकारी आणि नागरिकांचे आभार मानले.

किल्ले पुरंदर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

■ वालचंदनगर : (दै. संध्या)



इंदापूर तालुका ग्राम विकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब-वालचंदनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ऐतिहासिक किल्ले पुरंदर येथे एकदिवसीय स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ऐतिहासिक गड-किल्ले हा महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाचा, शौर्याचा आणि गौरवशाली परंपरेचा अमूल्य ठेवा आहे. या ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच गड-किल्ल्यांच्या परिसरात स्वच्छता राखण्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी किल्ले पुरंदर परिसरातील स्वच्छता करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांना ट्रेकिंगचा अनुभव मिळावा, गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा समजावा आणि हा वारसा जतन करण्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या अभियानासाठी संस्थेचे सचिव वीरसिंह रणसिंग तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळंगे सर यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेंद्रकुमार डांगे व डॉ.तेजश्री हुंबे तसेच विभागाचे सदस्य प्रा. नितीन रुपनवर, प्रा. अमर नांदगुडे, प्रा. सचिन पवार, प्रा. कोमल चव्हाण सहभागी झाले होते.या एकदिवसीय स्वच्छता अभियानामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. तसेच महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची ओळख होऊन गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याची प्रेरणा मिळाली. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ऐतिहासिक वारशाचे जतन यांचा सुंदर संगम या उपक्रमातून साधण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, श्रमप्रतिष्ठा, पर्यावरणाविषयी जागरूकता आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करणारी महत्त्वपूर्ण चळवळ आहे. स्वच्छता अभियाना सारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीचे जाणीव निर्माण होण्यास मदत होते. ऐतिहासिक वारसाचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

शिक्रापूर पोलिसांचा धडाका!

■ शिक्रापूर : (दै. संध्या)

हरवलेला मोबाईल पुन्हा मिळण्याची आशा सोडलेल्या नागरिकांना शिक्रापूर पोलिसांनी मोठा दिलासा दिला आहे. विविध कारणांमुळे हरवलेले आणि गहाळ झालेले तब्बल २९ मोबाईल फोन शोधून काढत सुमारे १४ लाख रुपये किमतीचे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले. तांत्रिक कौशल्य आणि प्रभावी तपासाच्या जोरावर शिक्रापूर पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०२६ मध्ये मोबाईल हरविण्याच्या आणि गहाळ होण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली होती. या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी गुन्हे शोध पथकातील तांत्रिक विश्लेषणाचे काम पाहणारे पोलीस हवालदार शिवाजी चितारे यांना हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली.

हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी केंद्र सरकारच्या CEIR पोर्टलचा वापर केला. पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या तक्रारींच्या आधारे संबंधित मोबाईलची माहिती संकलित करून तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्यातून मोबाईलचा माग काढत एकूण २९ मोबाईल शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. सुमारे १४ लाख रुपये किमतीचे हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, पोलिसांच्या तत्परतेमुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. मोबाईलमध्ये महत्त्वाचे संपर्क क्रमांक, वैयक्तिक माहिती आणि दैनंदिन व्यवहारांशी संबंधित तपशील असतात. त्यामुळे मोबाईल हरविल्यानंतर नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत तांत्रिक कौशल्याचा वापर करून हरवलेले मोबाईल शोधून ते मूळ मालकांच्या स्वाधीन करण्याची शिक्रापूर पोलिसांची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली आहे. नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांना मदत करण्यासाठी शिक्रापूर पोलीस कटिबद्ध असल्याचे या कारवाईतून दिसून आले. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार आणि शिरूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव आणि पोलीस हवालदार शिवाजी चितारे नारायण वाळके विकास नगर यांच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी केली. हरवलेले २९ मोबाईल शोधून १४ लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांना परत देत शिक्रापूर पोलिसांनी नागरिकांच्या विश्वासाला अधिक बळ दिले आहे.

Mivi One 5G ची सेल Flipkart BBD सोबत सुरू; किंमत ₹ 11,999 पासून

■ पुणे ,: (दै. संध्या)

ग्राहकोपयोगी तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय ब्रँड 'MIVI' ने आपला पहिला स्मार्टफोन - 'Mivi One 5G' - 'बिग बिलियन डेज' (BBD) सेल अंतर्गत केवळ 'फ्लिपकार्ट'वर (Flipkart) विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. ८ ऑक्टोबरपासून ग्राहक हा स्मार्टफोन ११,९९९ रुपये* या विशेष सणासुदीच्या किंमतीत खरेदी करू शकतील.

"Pretty Powerful" (अत्यंत प्रभावी) अशी ओळख असलेला 'Mivi One 5G' हा स्मार्टफोन उत्कृष्ट कामगिरी, आकर्षक डिझाइन आणि दैनंदिन वापरासाठीची अष्टपैलू उपयुक्तता यांचा सुरेख संगम साधतो. ग्राहकांची जीवनशैली, कामाची पद्धत आणि संपर्कात राहण्याची गरज लक्षात घेऊन हा स्मार्टफोन तयार करण्यात आला आहे. 'Mivi One 5G' केवळ फ्लिपकार्टवर उपलब्ध असेल.

'बिग बिलियन डेज' (BBD) अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या विशेष किंमती या लागू असलेल्या बँक ऑफर्सचा समावेश करून निश्चित केल्या आहेत आणि त्या फ्लिपकार्ट व संबंधित बँकांच्या अटी व शर्तींच्या अधीन आहेत.फ्लिपकार्ट बिग बिलियन डेज सेलदरम्यान, MIVI One 5G विशेष प्रभावी किमतीत उपलब्ध असेल, फ्लिपकार्ट 'बिग बिलियन डेज' सेलदरम्यान, MIVI One 5G विशेष प्रभावी किमतीत उपलब्ध असेल: ४GB + १२८GB व्हेरिएंटसाठी ₹११,९९९*, आणि अनुक्रमे ६GB + १२८GB व ८GB + १२८GB व्हेरिएंट्ससाठी ₹१३,४९९* व ₹१४,९९९*. 4nm Qualcomm Snapdragon 4 Gen 2 5G मोबाइल प्लॅटफॉर्मद्वारे समर्थित, MIVI One 5G विश्वसनीय 5G कनेक्टिव्हिटीसह प्रतिसादात्मक दैनंदिन कार्यप्रदर्शन एकत्र करते. स्मार्टफोनमध्ये 6.75-इंचाचा HD+ 120Hz डिस्प्ले, 50MP ड्युअल-कॅमेरा सिस्टम, 8MP फ्रंट कॅमेरा आणि 18W जलद चार्जिंगसह 6000mAh बॅटरी आहे.

पात्र 'फ्लिपकार्ट प्लस', 'व्हीआयपी' आणि 'ब्लॅक' सदस्य तसेच पात्र कार्डधारकांसाठी ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२ वाजता 'अर्ली ॲक्सेस' सुरू होईल, तर ९ ऑक्टोबर २०२६ पासून सर्वांसाठी विक्री खुली होईल.

एसआर ए कार्यालयावर रिपब्लिकन संघर्ष दलाचे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)



युनिव्हर्सिटी रोड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी पुनर्वसन प्राधिकरण पुणे पिंपरी चिंचवड कार्यालयावर रिपब्लिकन संघर्ष दलाचे नेते संजय भिमाले यांचे नेतृत्वात जवाब दो बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी पुर्नवसन प्राधिकरण पुणे, पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे कार्यालय येथे गोरगरीब कष्टकरी अनूसूचित जातीतील व वंचित झोपडीधारक, फायनल प्लॉट न ८९८ व छत्रपती शिवाजी स्टेडियम मंगळवार पेठ, जुना बाजार पुणे यांच्या झोपडीचा सर्व्हे ४ वर्षापुर्वी झालेला असतानाही अद्याप या योजनेची अंमलबजावणी होत नसून वंचित झोपडीधारकांच्या योजनेत विलंब होत असून या बेजबाबदार भ्रष्ट कारभाराच्या निषेधार्थ एसआरए कार्यालयातील बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी युनिव्हर्सिटी रोड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी पुनर्वसन प्राधिकरण पुणे पिंपरी चिंचवड कार्यालयावर जवाब दो बोंबाबोंब आंदोलन संघटनेचे नेते संजयजी भिमाले यांच्या नेतृत्वात करण्यात आले. मागण्यांचे निवेदन पुर्नवसन प्राधिकरणचे सचिव, शितल निकम यांना देण्यात आले.

यावेळी. पुणे शहर अध्यक्ष नितीन बालकी, पुणे शहर संघटक विशाल अंदे, इरफान सैय्यद, घनशाम फुलपगार, अजय शिंदे, संजय गायकवाड, ॲड. राकेश टोटे पाटील, खालीद शेख, दिनेश सदगुरे, साई श्रीवास्तव आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.